बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

### दशनाम गोसावी समाज परिषद

बीडः महाराष्ट्र शासनाने इनामी, देवस्थान जमिनीची मिळकत मूळ मालकाच्या नावे करण्याबाबत सकारात्मक पाऊल उचलले आहे. परंतु याबाबत सखोल मार्गदर्शन प्राप्त करून घेण्यासाठी दशनाम गोसावी समाज परिषदेच्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे शनिवार १० ऑगस्ट २०२४ रोजी बैठक आयोजित केली आहे. या बैठकीस गोसावी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अॅड.राजेंद्र बन, जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गिरी, दत्ता महाराज गिरी यांनी पत्रकाद्वारे केले आहे

बीड | मंगळवार, दि.६ऑगस्ट २०२४ | वर्षे४रे | अंक८ला | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# यांचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत?

## धनंजय मुंडे आणि अमरसिंह पंडितांवर दलित समाज चिडला! • अमर नाईकवाडे आणि फारुख पटेल निघाले भलते करामती? • दलित निधी वळविला, संघटना काम अडविण्याच्या तयारीत

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात दलितांच्या वाट्याला फार काही आले आहे असे दिसून येत नाही. या समाजाच्या मतांचा केवळ आणि केवळ वापर केला जातो. त्यांच्या हक्काच्या योजनांचा निधी देखील तेवढ्या प्रमाणात कधीही पोहोचवू दिला जात नाही. याचे जिवंत उदाहरण म्हणजे बीडचे माजी नगरसेवक अमर नाईकवाडे आणि फारुख पटेल यांचे देता येईल. कारण अण्णाभाऊ साठे दलित वस्ती नागरी सुधार योजनेचा निधी, इतर ठिकाणी वळून दलितांना विकासापासून वंचित ठेवलं आहे.या दोघांच्या कटकारस्थानात मंत्री धनंजय मुंडे आणि माजी आ.अमरसिंह पंडित यांचा मोठा हात राहिलेला आहे. त्यामुळे यांचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत? हे पून्हा एखादा स्पष्ट झालं आहे. आशा संतप्त प्रतिक्रिया समाजातून उमटत असून येत्या निवडणूकीत नेत्यांना त्याचा फटका बसल्याशिवाय राहणार नाही, असेच म्हणावे लागेल. पान २ वर...



## दलित योजनांचा निधी वळवे

## बीडचे नेते दलितांची मत खाऊन आता निधीही खाऊ लागले!



बीड : मंत्री धनंजय मुंडे यांना दलित विकासाचा निधी वळविण्याचे पत्र देतांना अमर नाईकवाडे, फारुख पटेल दिसत आहेत.

### अमरसिंह पंडित आणि धनंजय मुंडे दलित विरोधी?


दलितांचा निधी, त्यांना न मिळू देणे. दलित योजनेचा निधी हवा तसा कुठेही वळवून त्यांना विकासापासून दूर ठेवणे. या गोष्टी दलित समाजाला बऱ्यापैकी ठाऊक आहेत. मात्र त्यावर कोणी आवाज उठवित नव्हते. परंतु आता लोक आवाज उठवू लागले आहेत, बोलू लागले आहेत. खरंतर अमर नाईकवाडे यांच्या पत्रावरुन एक गोष्ट पून्हा स्पष्ट होते की,अमरसिंह पंडित आणि धनंजय मुंडे यांची भूमिका दलित विरोधीच आहे. आशा संतप्त प्रतिक्रिया दलित समाजातून व्यक्त होताहेत?



### अमर नाईकवाडेंची फेसबुक पोस्ट जशाच तशी?

पालकमंत्री ना.धनंजयजी मुंडे यांच्या माध्यमातून व माजी आमदार अमरसिंहजी पंडित यांच्या सहकार्याने जिल्हा नियोजन मधून मोंढा रोडचा प्रश्न मार्गी लागला.येत्या आठ दिवसात प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर १५ ते २० दिवसात टेंडर प्रक्रिया पूर्ण होईल.साधारण महिनाभरात रस्ता कामाला सुरुवात होणार आहे याची कृपया बीड शहरातील जनतेने नोंद घ्यावी.

## असे आहे दिलेले पत्र!



नाईकवाडे अमर मारुतीराव
नगरसेवक नगर परिषद, बीड.
विप्रनगर, बीड.
Mo: 9028024111 I E-mail : amarnaikwade1055@gmail.com

दिनांक : 02 / 08

प्रति,

मा. ना. धनंजयजी मुंडे साहेब,
कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य तथा
पालकमंत्री बीड जिल्हा

विषय :- लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजना सन 2024 – 2025 अंतर्गत बीड नगर परिषद हद्दीतील खालील विकास कामे प्रस्तावीत करणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये जिल्हा नियोजन समिती च्या माध्यमातून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना 2024-25 अंतर्गत मी प्रतिनिधित्व करत असलेल्या प्रभाग क्रमांक 3 मध्ये आपल्या माध्यमातून विविध विकास कामे करण्याकरिता देण्यात येणारा निधी हा प्रभाग क्रमांक 2 मधील खालील कामाकरिता देण्यात यावा ही विनंती.

बीड नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक 2 मधील शिवशारदा बिल्डिंग (जालना रोड) ते अमरधाम स्मशानभूमी (मोंढा रोड) पर्यंतचा रस्ता हा दुभाजकासह सिमेंट कॉंक्रेटचा करण्यात यावा ही नम्र विनंती.

आपले विश्वासू

फारुख पटेल    अमर नाईकवाडे



जिल्हा नियोजन समितीम्हणजे पालकमंत्री धनंजय मुंडे यांची मक्तेदारी नाही. स्वतः ला मागासवर्गीय म्हणून दलितांच्या हक्काचा निधी हिसकावून घेण्याचा अधिकार पालकमंत्र्याना कोणी दिला.दलित वस्ती सुधार योजनेच निधी वळवणाऱ्या धनंजय मुंडेंना येणाऱ्या विधानसभेमध्ये याचे परिणाम भोगावे लागतील.

**अमोल शेरकर**, मातंग समाज नेते,माजलगाव



अनुसूचित जातीचा निधी वळवून त्यांना विकासापासून दूर ठेवले जात आहे. त्यामुळे माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, फारूक पटेल यांना यंदाच्या निवडणुकीत जनताच धडा शिकवणार आहे. जर अनुसूचित जातीचा निधी इतरत्र वळविला तर वंचित बहुजन आघाडीकडून याआंदोलन छेडण्यात येईल.निधी इतरत्र वळवीन्याचा प्रयत्न करणाऱ्या अधिकाऱ्यावर ट्रॉसिटीनुसार गुन्हे दाखल करावेत.

**अजय सरवदे**,युवा नेते,वंचित बहुजन आघाडी बीड



प्रभाग क्रमांक ३ मध्ये अनुसूचित जातीतील लोकांच्या घरासमोरील रस्ते अद्यापपर्यंत केलेले नाहीत. हनुमान नगर व पूरग्रस्त कॉलनी या ठिकाणी दलित वस्ती असून त्या ठिकाणी रस्ते केले नाहीत. आतापर्यंत या रस्त्यावर गुडघ्या एवढे गवत वाढलेले आहे. गेल्या वर्षी मी स्वतः स्वखर्चाने मुरूम टाकून रस्ते करून दिले आहेत. नगरसेवक स्वतः च्या फायद्यासाठी फक्त आश्वासन देतात व अनुसूचित जातीचा निधी इतरत्र वळवितात.असे झाल्यास या भागातील नागरिकांना सोबत घेऊन मोठे आंदोलन उभा केले जाईल.

**विनोद हातागळे**,सामाजिक कार्यकर्ते,बीड



दलितांचा मतापुरता वापर केला जातो. जो कोणी आमचा निधी हडप करुन दुसऱ्या ठिकाणी वापरत असेल त्यांचा आम्ही निषेध करतो ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने ऍट्रॉसिटी क्ट अंतर्गत गुन्हा दाखल करू आमचा निधी आम्ही राहत असलेल्या वस्त्यांमध्ये वापरला जावा ही आमची भूमिका आहे. अन्यथा उग्र स्वरुपाचे आंदोलन केले जाईल. ज्यांना दलितांच्या वस्तीमध्ये सुख सुविधा द्यायच्या नाहीत त्यांना या विधानसभेला आम्ही जागा दाखवल्या शिवाय राहणार नाहीत. तसेच लवकरच तक्रार देणार आहोत.

**नितीन सोनवणे** जिल्हाध्यक्ष,ऑल इंडिया पँथर सेना बीड.

---

**कारवाई** | पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

# धर्म परिवर्तनासाठी पोलीस पत्नीचा छळ

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

धर्म परिवर्तन करण्यासाठी दबाव टाकून पोलीस पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ केला, तसेच पैसे दे नाहीतर तलाक दे असे म्हणून नंतर परस्पर दुसरे लग्न केल्या प्रकरणी आष्टी येथील व्यावसायिकाच्या मुलासह कुटुंबातील सातजणांवर आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत पिडीत महिलेने पोलिसात फिर्याद दिली असून, त्यावरून पती सोहेल लैकुद्दिन काजी, सासरा लैकुद्दिन मोहम्मद काझी, सासू रझियाशाहिन लैकुद्दिन काझी, चुलत सासू राफियाशाहिन काझी ( राणाबाजी), नणंद आफिया काझी व मेहविश काझी तसेच पतीची दुसरी पत्नी आयशा शेख (सर्व रा. शनीचौक, आष्टी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीत म्हटले आहे की, ता. ११ ऑक्टोबर २०१८ रोजी स्पेशल मॅरेज अॅक्ट या कायद्यानुसार आमचा विवाह झाला. त्यावेळी मी माझ्या धर्माने राहणार व ते त्याच्या धर्माने राहणार असे ठरले होते. लग्नाच्या काही दिवसापर्यंत पती माझ्यासोबत धर्माच्या बाबतीत काही बोलला नाही. परंतु नंतर धर्मावरून छळ करण्यास सुरुवात केली.

सोहेल हा सिदपूर (गुजरात) येथे बँकेत नोकरीस होता, तर फिर्यादी या नागपूर येथे पोलीस विभागात नोकरीस होत्या. बँकेतील अफरातफरीच्या प्रकरणात पतीला १३ सप्टेंबर २०२१ रोजी सस्पेंड करण्यात आले. त्यावेळी आम्ही दोघे गुजरात येथे राहत होतो. ऑक्टोबर २०२१ रोजी मुलगा झाला. त्यानंतर पती कोणत्या ना कोणत्या कारणावरुन नेहमी भांडण करू पान २ वर...

# संपादक बाळासाहेब मस्केंचा अटकपूर्व जामीन झाला मंजूर

## न्याय मिळाला: गेवराईत राजकीय द्वेषातून रचले होते षडयंत्र

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले बीएम प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा दैनिक पुण्यभूमीचे मुख्य संपादक बाळासाहेब मस्के यांच्या विरोधात गेवराई पोलीस ठाण्यात राजकीय द्वेषातुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांना जामीन मिळू नये म्हणून प्रयत्न केले जात होते. बीड कोर्टाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर औरंगाबाद हायकोर्टात जामिन अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यावर सोमवार (दि.५) ऑगस्ट रोजी सुनावणी झाली. त्या सुनावणीत ड.

शशिकांत शेकडे यांनी प्रभावी युक्तिवाद करुन भक्कमपणे बाजू लावून धरली. त्यानंतर औरंगाबाद हायकोर्टाने बाळासाहेब मस्के यांचा अटकपूर्व जामिन मंजूर केला आहे. या जामिनाची बाजू मांडताना ड.प्रदिप निंबाळकर यांनी विशेषतः सहकार्य केले. माझ्या विरोधात कटकारस्थान करुन गुन्हे दाखल केले होते. परंतु न्याय देवतेवर आपला पूर्णपणे विश्वास होता. असे मत बाळासाहेब मस्के यांनी व्यक्त केले. गेवराई पोलीस ठाण्यात गोकुळ बाबुराव चोरमले या व्यक्तीने राजकीय लोकांच्या सांगण्यावरुन बाळासाहेब मस्के आणि त्यांच्या कुटुंबातील अन्य व्यक्तींच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. त्या गुन्ह्यात कुटुंबातील काही व्यक्तींना बीड कोर्टात जामीन मिळाला होता. परंतु बाळासाहेब मस्के यांचा अटकपूर्व जामिन अर्ज फेटाळला होता. त्यानंतर औरंगाबाद हायकोर्टात बेलसाठी अर्ज सादर करण्यात आला होता. त्यामध्ये ड.शशिकांत शेकडे यांनी, कोर्टात अतिशय मुद्देसूद प्रभाविपणे बाजू मांडून ती लावूनही धरली. त्यामुळे एकंदरीत सदरील प्रकरण पाहता, आणि युक्तिवाद एकूण घेत,कोर्टाने बाळासाहेब मस्के यांचा जामिन अर्ज मंजूर केला आहे.त्यामुळे न्यायालयावर आपला पूर्णपणे विश्वास होता, असे मत बाळासाहेब मस्के यांनी व्यक्त केले.







## अभियंत्यांचा अभिशाप

पैसा फिरवून सधन होणारे वित्तीय क्षेत्रातील गुणवंत जितके वाढले, तितके काही तरी निर्माण करून संपत्तीवृद्धी करणारे अत्कृष्ट अभियंते आपल्याकडे नाहीत इमारती का पडतात? पूल का कोसळतात? संसदेची नवी कोरी इमारत आणि अयोध्येतील राममंदिर एका पावसात का गळू लागते? भ्रष्टाचार या सार्वकालिक सत्याखेरीज या आणि अशा अन्य काही प्रश्नांच्या उत्तरात एक समान मुद्दा आहे– चांगल्या अभियंत्यांची वानवा. तो आताच निर्माण झालेला नाही. गेल्या काही वर्षांत आपल्या समाजधारणेत झालेल्या निश्चित बदलाचा हा परिणाम आहे आणि त्याचे गांभीर्य अद्यापही आपण लक्षात घेण्यास तयार नाही. शेती क्षेत्राकडून असलेल्या अवास्तव अपेक्षा, सेवा क्षेत्र– सर्व्हिस इंडस्ट्री– नामे मृगजळाचे वाढते आकर्षण आणि सरकारी नोकऱ्यांबाबत अजिबात कमी न झालेला हव्यास अशा काही कारणांचा एकत्रित परिपाक म्हणून आपल्या देशातली गुणवंत अभियंता निर्मिती जवळपास थांबलेली आहे. त्यातून सध्याची गंभीर अवस्था आपल्यासमोर ओढवलेली असून या परिस्थितीच्या निदानात अजूनही उत्तम अभियंत्यांची अनुपलब्धता हा मुद्दा आपण पुरेशा गांभीर्याने घेत असल्याचे दिसत नाही. पायाभूत सुविधा नामक स्वप्नांच्या पूर्ततेचा गजर आपल्याकडे सुरू असताना अभियंत्यांची वानवा या मुद्द्याकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरते. आर्थिक उदारीकरणाचे वारे वाहू लागले नव्हते तोपर्यंत अभियांत्रिकीच्या तीन शाखांवर आपल्याकडे भर दिला जात असे. यांत्रिकी (मेकॅनिकल), विद्युत (इलेक्ट्रिकल) आणि स्थापत्य (सिव्हिल) अभियांत्रिकी या तीन शाखांची विभागणीही गुणानुक्रमे होत असे. यापेक्षाही गुणवान 'आयआयटी'त जात. त्याही काळात याद्वारे होणारी अभियंत्यांची निर्मिती पुरेशी नव्हतीच आणि होते त्यातील गुणवान परदेशी जाण्यात धन्यता मानत. ही अभियंत्यांची संख्या वाढवावी या वरकरणी आणि दिखाऊ हेतूने आणि स्वपक्षीय राजकारण्यांस धननिर्मितीचे सहज सोपे साधन निर्माण व्हावे या अंतस्थ आणि खऱ्या हेतूने तेव्हा खासगी अभियांत्रिकीची दुकाने आपण मोठ्या प्रमाणावर उघडली. एखादी नवी योजना हाती घेण्याआधी तिच्या अंमलबजावणीचा साकल्याने विचार आणि तशी तयारी न करण्याचा आपला ऐतिहासिक परिपाठ याबाबतही दिसून आला. या नव्या खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांकडे ना आवश्यक साधनसामग्री होती ना प्रशिक्षित अध्यापक. त्यात या संस्थांचे चालक पडले राजकारणी. त्यामुळे कोणत्याही दर्जा निश्चितीखेरीज पिठाच्या चक्क्यांप्रमाणे ही अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली गेली. स्वपक्षीय राजकारण्यांस सुखावण्यासाठी वा अन्यपक्षीय राजकारणी आपल्याकडे यावेत यासाठी या महाविद्यालयांचा खिरापतीप्रमाणे वापर झाला. ही महाविद्यालयांची संख्या इतकी वाढली की ती जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक विद्यार्थीही आपणास मिळेनासे झाले. ही धोक्याची पहिली घंटा. तीकडे दुर्लक्ष केल्याने परिस्थिती सुधारण्याऐवजी अधिकच बिघडत गेली. ती आणखी रसातळाला नेण्यात महत्त्वाचा वाटा उचलला नव्याने उदयास आलेल्या संगणकीय विद्याशाखेने. त्यातही बाजारपेठी आकर्षणास बळी पडून घरोघरी आपल्या लेक/लेकीस ''तू हार्डवेअरपेक्षा 'सॉफ्टवेअर'ला जा'' असे सल्ले मुबलक पालक देत. त्यामुळे अमूर्त अशा या विद्याशाखेत भरती होणारे वाढत गेले. त्यातील बहुसंख्य हे 'संगणकीय टंकलेखक' या दर्जाचे होते हे नाकारणे अवघड. यांचीही संख्या अखेर इतकी वाढली की बरकत असूनही सॉफ्टवेअर उद्योगावर त्यांना दरवाजाबाहेर बाकांवरच बसवण्याची वेळ आली. मागणीपेक्षा पुरवठा अधिक झाला– आणि तोही कमअस्सल दर्जाचा– की यापेक्षा आणखी काय होणार? संगणक अभियंते वाढले म्हणून भारतीयांनी काही संगणकीय उत्पादनांची निर्मिती केली म्हणावे तर त्याबाबतही बोंब. या क्षेत्रातील जे गुणवान होते त्यांनी अमेरिकेचा रस्ता धरला आणि गूगल, ॲपल, ॲमेझॉन, मायक्रोसॉफ्ट आदी क्रियाशीलांची सेवा करण्यात धन्यता मानली. हे कमी म्हणून की काय या काळात एका नव्याच क्षेत्राचा उदय झाला.ते म्हणजे सेवा क्षेत्र. कुणीतरी घरे बांधायची आणि इतरांनी ती सांभाळायची, घरात काही हवे–नको ते पाहायचे आणि लागेल तेव्हा हरकामास दाराशी सेवेस सादर व्हायचे म्हणजे 'सर्व्हिस इंडस्ट्री'. कितीही उदात्तीकरणाचा प्रयत्न केला तरी सेवा क्षेत्र म्हणजे अखेरीस यापेक्षा अधिक काही नाही. इंटरनेट महाजालाच्या प्रसार– प्रभावामुळे दूरदेशीच्या आस्थापनांचे पगार काढणे, कर्मचारी व्यवस्थापन, दूरध्वनीवरून माहिती देणे इत्यादी उद्योग येथे बसून करण्याची सुविधा मोठ्या प्रमाणात वाढू लागल्याने आणि त्या प्रमाणात त्या क्षेत्रात रोजगारनिर्मितीही मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याने आपल्याकडे तरुणांच्या झुंडीच्या झुंडी त्या क्षेत्रात दाखल होऊ लागल्या. इतके दिवस अमेरिका, युरोप आदी विकसित देशांतील नोकरीच्या उच्चमध्यमवर्गीयांपुरत्याच उपलब्ध असलेल्या संधी या सेवा क्षेत्राच्या विस्ताराने बहुजन समाजातील तरुणांसही सहज मिळू लागल्या आणि पुणे, पार्ले, डोंबिवली आदी शहरांची मक्तेदारी पिंपरी–चिंचवड, परभणी आणि डिग्रस आदींनी मोडून काढली.

# महिला राष्ट्राध्यक्ष निवडण्याची संधी?

अमेरिका हा लोकशाही प्रणाली मानणारा जगातील क्षेत्रफळाने मोठ्या देशांपैकी प्रमुख असून येथील राज्यप्रणाली 'अध्यक्षीय लोकशाही' आहे.हे ठाऊकच आहे. अमेरिकेत सध्या अध्यक्षीय पदाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे.युनायटेड स्टेट्स ही प्रातिनिधिक लोकशाही आहे. याचा अर्थ सरकार नागरिक निवडतात. युनायटेड स्टेट्समधील मूळ अमेरिकन नसलेल्या लोकांमध्ये थेट लोकशाहीचा इतिहास न्यू इंग्लंड वसाहतींमध्ये १६३० पासूनचा आहे. न्यू इंग्लंड वसाहतींच्या विधानमंडळांना सुरुवातीला लोकप्रिय असेंब्ली म्हणून शासित केले जात होते, प्रत्येक स्वतंत्र व्यक्ती अधिकाऱ्यांच्या निवडणुकीत आणि कायद्यांचा मसुदा तयार करण्यासाठी थेट मतदान करण्यास पात्र होता. अमेरिकन लोकशाही देश विकसित झाला त्याची कारणे म्हणजे सुशिक्षित आणि दृढनिश्चयी स्थायिकांपासून सुरुवात करून त्यांनी विश्वासार्ह शेती, मूलभूत उद्योग आणि विश्वासार्ह शाळा स्थापन केल्यावर त्यांनी नवनवीन संशोधन करायला सुरुवात केली. नवकल्पनांनी नवीन उद्योगांची निर्मिती केली, ज्याने नवीन संपत्ती दिली, ज्याने अधिक शिक्षणाला अनुमती दिली, ज्याने अधिक नवकल्पनांना प्रोत्साहन दिले आणि ही प्रक्रिया चालू राहिली त्यामुळे अमेरिका विकसित झाला .या विकसित राष्ट्रांच्या निवडणुका म्हणजे जगाचे लक्ष.यंदाच्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाकडून कमला हॅरिस तर रिपब्लिकन पक्षाकडून माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उभे आहेत.आपापली बाजू मांडण्यासाठी ते मतदारांना पटवून देत आहेत. डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष असतानाची म्हणजे विद्यमान अध्यक्ष ज्यो बायडेन यांच्या पूर्वी त्यांची कारकीर्द अमेरिकेच्या इतिहासात वादग्रस्त ठरली ती म्हणजे परकीयांना विरोध केल्याने.असो, मात्र रिपब्लिकन पक्षाची मुळात विचारधारा ही पुराणमतवादी आहे. त्यामुळे अमेरिकेत मुख्यतः पुराणमतवादी किंवा उदारमतवादी असलेल्या



डेमोक्रॅटिक पक्षाची सत्ता राहिली आहे.त्यामुळे या दोनच पक्षाची सत्ता अमेरिका नागरिकांना लोकशाही शासन देते. पुराणमतवादी विचारधारा पुरातन काळापासून चालत आलेल्या पारंपरिक प्रथा व संस्कृती जोपासली जाते.नवे विचार स्विकारायला वेळ लागतो किंवा अगदी पुरातन गोष्टीला चिकटून असतात.युनायटेड किंग्डममधील हुजूर पक्ष, भारतामधील भारतीय जनता पक्षाची धोरणे देखील पुराणमतवादाकडे झुकणारी आहेत. भाजपची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघांची पुराणमतवादी विचारधारा आहे.खर तर लोकशाही म्हणजे मुळात परिवर्तन घडवून आणणारी प्रकिया. याऊलट डेमोक्रॅटिक पक्ष आहे. उदारमतवाद हे स्वातंत्र्य आणि समता यावर आधारित आहे. उदारमतवादी लोक समता, बंधुता या तत्त्वाचा दृष्टीकोन बाळगतात.लोकशाही, मुक्त आणि प्रामाणिक निवडणूका, नागरी अधिकार, प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, मुक्त व्यापार, आणि खाजगी मालमत्ता ह्यांसारख्या विचारांचे समर्थन करतात. त्यामुळे अमेरिकेत पुरातनवादी आणि उदारमतवादी विचारांच्या या दोन्ही पक्षाची सत्ता राहिली आहे.हा विचारांतील



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

फरक तर वर्णद्वेष आणि आपल्याकडे जातीवाद या दोन्ही बाबी लोकशाही देशाच्या विकासातील आव्हान. आपल्याकडे नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत निव्वळ पुरातनवादी किंवा पुरोगामीवादी (पुरोगामी)अशा कोणत्याच पक्षाला बहुमत दिले नाही.ही बाब खरी पण आपण म्हणतो तसे एक तर पहिला किंवा शेवटचा मध्याला किंमत नसते तसे आता सरकारचे झाले आहे. असो, अमेरिका पुन्हा डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवाराला निवडून देते कि रिपब्लिकन पक्षांच्या उमेदवाराला त्यावरून अमेरिकेत पुरातनवादी किंवा उदारमतवादी विचारांच्या पक्षाचे सरकार येईल. डेमोक्रॅटिक पक्षाच्या आजवरच्या अध्यक्षांची कारकीर्द अमेरिकेच्या इतिहासात लक्षात ठेवणारी ठरली आहे.अँड्रयू जॅक्सन,मार्टिन वान ब्युरन, जेम्स पोक, फ्रँकलिन पियर्स , जेम्स ब्युकॅनन,अँड्रयू जॉन्सन ग्रोव्हर क्लीव्हलँड,वूड्रो विल्सन , फ्रँकलिन डिलानो रूझवेल्ट हॅरी ट्रुमन,जॉन एफ. केनेडी, लिंडन बी. जॉन्सन , जिमी कार्टर , बिल क्लिंटन ,बराक ओबामा ,ज्यो बायडेन यांचा कार्यकाळ तर प्रत्येक अमेरिकन नागरिकांना अभिमान वाटावा असा.तर आता डेमोक्रॅटिक पक्षाच्या भारतीय वंशाच्या अमेरिकन वकील, लेखिका आणि राजकारणी कमला देवी हॅरिस राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून आहेत. २०१० मध्ये झालेल्या अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्याच्या निवडणुकीमध्ये त्यांची टर्नी जनरल पदावर राहिल्या आहेत. त्या कॅलिफोर्निया राज्याच्या ३२ व्या टर्नी जनरल आहेत. ७ नोव्हेंबर, २०२० रोजी त्या अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्षपदी निवडून गेल्या.कमला देवी हॅरिस अध्यक्षपदाच्या उमेदवार निवडून आल्या तर अमेरिकेच्या इतिहासात त्यांची पहिली महिला राष्ट्राध्यक्ष म्हणून नोंद होईल. यापूर्वी त्यांनी पहिली महिला उपाध्यक्ष म्हणून इतिहासात नांव आहे आता अमेरिकेला उदारमतवादासह पहिली महिला राष्ट्राध्यक्ष निवडण्याची संधी जवळ आली आहे.

# चिटकून बसलेला मुंदडा हाकलून द्या?

## सवाल : दीर्घकाळ सत्ता तरी,कोणत्याच समाजाला न्याय नाही

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज मध्ये राजस्थानी व्यापारी म्हणुन आले व राज्य करते झाले मोढ्यात चिंध्या फाडणारा शेठजी व्यापारी म्हणून आले होते व तसेच त्यांनी आंतरजातीय प्रेम विवाह झाला, नंदू मुंदडा पवार साहेबांकडे गेले व्यापारी डोके मंत्री पालकमंत्री आरोग्य मंत्री अशी पदे भूषवली, पण बेरोजगारासाठी एखादी एमआयडीसी एखादा कारखाना जेणेकरून सर्वसामान्यांना रोजगार मिळेल अशी कोणताच उद्योग,कारखाना आणला नाही२५ ते ३० वर्षापासून फक्त विकासाच्या गोंडस नावाखाली कमिशन खाणे एक सूत्री कार्यक्रम व्यापारी हाकत आहे, ते एक तानाशाही हुकुमशाही चालू आहे तसेच त्या व्यापाऱ्याच्या मुलाने मुंबई ची बायको केली व सांध्यांच्या काळात विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांनी केज अंबाजोगाई तालुका लुटला आहे. केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघ राखीव आहे परंतु केज तालुक्यात आलेला व्यापाऱ्यांच्या हाती पंचवीस तीस वर्षे झाले केजच्या जनतेने सत्ता दीली आहे हे



दुर्दैव आहे.केज मतदार संघ राखीव होता त्यांनी आरक्षणाचा फायदा घेत भाजप चे उमेदवार झाले,शेठजी, नाही ओ बी सी, नाही मराठा, नाही एसी नंदकिशोर मुंदडा बायको मुळें नंदकिशोर मुंदडा व्यापारी पुन्हा शरदचंद्रजी पवार कडे कोलांट्या मारुन आरोग्य मंत्री पद व पालक मंत्री पदाचा उपभोग घेतला . पंचवीस तीस वर्षे झाले ऐक व्यापारी मागासवर्गीयांचा फायदा उचलत आहे यांचे भान जनतेने ठेवले पाहिजे .नंतर व्यापाऱ्यांच्या मुलाने सुन ही मागासवर्गीयांची केली,व लाभ सासरे व युवराज अक्षय मुंदडा यांनी घेउन कोट्यावधी ची मालमत्ता जमवली आहे. ऐका चिंध्या गोळा करणाऱ्या व्यापाऱ्यांचे बाहेर मोठं मोठें बंगले पेट्रोल पंप पुणे मुंबई येथे बंगले जमीन प्लाटीगची जमीन हि कीमया गेल्या तीस वर्षांपासून केज अंबाजोगाई विधानसभा लढवुन मतदार संघ लुट्न संध्या व्यापारी राजस्थानी शेठजी लाभ घेत आहे आतापर्यंत सर्वच समाजाला निवडणूकीत भुलथापा देउन इंग्रजा सारखें राज्य केले वहकरीत आहेत आता ब्रेक लावने गरजेचेच आहे, मागासवर्गीय ,ओ बी सी,मराठा, जागृत होऊन मतदान करावेत व मुंबई च पार्सल, राजस्थानी पार्सल परत पाठविण्याचा संकल्प करुया शेठजी व युवराज ची आरे रावी निजामशाही हुकूमशाही मोडीत काढण्यासाठी आमदारा नमीता मुंदडा यांना जनता जनार्दन येणाऱ्या विधानसभेत दील्या घरी सुखी रहा या मराठी म्हणी प्रमाणे आमदारा नमीता मुंदडा यांना जनता जनार्दन निवडणूकीत जागा दाखवून देणार आहे असे चर्चा सत्र मतदार संघात सुरू झाले आहे.

## पान एक वरून

### यांचे खायचे दात...

बीड येथील प्रभाग ३ मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत २०२४–२५ साठी निधी मंजूर होता. मात्र बीड नगर परिषदेवर प्रशासक असतानाही, माजी नगरसेवक अमर नाईकवाडे आणि फारुख पटेल या दोन महान व्यक्तींनी कमाल केली आहे. बीड शहरातील प्रभाग ३ मध्ये मंजूर असलेला निधी, प्रभाग २ मध्ये वळविण्यात यावा, असे पत्र मंत्री धनंजय मुंडे यांना दिले. त्यासाठी गेवराईचे माजी आ.अमरसिंह पंडित यांनी सहकार्य करुन दलितांचा निधी वळविण्यास हातभार लावला आहे. त्यामुळे दलित समाज या निधी पळव्या नेत्याना त्यांची खरी जागा नक्की दाखवून देईल यात काही शंका नाही. बीड नगर परिषदची निवडणूक झालेली नाही, त्यामुळे नगरसेवक असण्याचा प्रश्नच येत नाही. परंतु अमर नाईकवाडे यांनी दि.२ ऑगस्ट २०२४ रोजी नगरसेवक पदाचा लेटरहेड वापरुन धनंजय मुंडे यांना, निधी वळविण्यासंदर्भात पत्र दिल आहे. त्यावर अमर नाईकवाडे आणि फारुख पटेल यांच्या स्वाक्षरी आहेत. त्यामुळे दलित विरोधी असल्याची ही बाब दलित समाज आणि नेत्यांच्या लक्षात आली आहे. आशा प्रतिक्रिया दलित समाजातून उमटत आहेत.

### धर्म परिवर्तनासाठी पोलीस....

लागला. प्रसूतीच्या सहा दिवसानंतर मला मारहाण केली. मे २०२२ मध्ये पतीच्या नाकाच्या शस्त्रक्रियेसाठी सासरा, सासू, नणंद सर्वजण आष्टीतून गुजरातला आले. तेथे तू मुस्लिम नसल्याने आमच्यात राहू शकत नाही. त्यामुळे तुला आम्ही मान्य करणार नाही अशा नेहमी धमक्या देत असत. लेकरु जरी झाले तरी मी तुझा संसार होऊ देणार नाही. तू मला कधी मान्य नाहीस आणि मी तुझा घटस्फोट होण्यास भाग पाडेल. तू माझ्या मुलाला सोड असे म्हणून सासूने अश्लील शिवीगाळ केली. तू हिला सोडून दिले नाही तर तुला आम्ही प्रॉपर्टी देणार नाही व घरातून बेदखल करु अशा धमक्या कुटुंबीय पतीला देत असल्याने त्यांच्या सांगण्यावरून पती भांडण व मारहाण करीत असे. त्यामुळे दोघे विभक्त राहू लागले. एक–दोन वेळेस दोघांमध्ये समेटाचे प्रयत्न झाले. परंतु पतीच्या वर्तनात सुधारणा झाली नाही. सासू–सासरे नेहमी तुला आमच्या मुस्लिम रितीरिवाजाप्रमाणे राहावे लागेल. तुला मुस्लिम धर्म स्वीकारावा लागेल. तू असे केले नाहीस तर आम्हाला तू मान्य नाहीस. तू धर्म परिवर्तन केले नाही तर तुला आमच्या घरात तसेच माझ्या मुलाच्या आयुष्यात स्थान नाही व तुला माझ्या मुलाला तलाक द्यावा लागेल अशी धमकी देून मानसिक व शारीरिक त्रास देण्यास सुरुवात केली.

पतीही फिर्यादीला नेहमी तू पोलीस खात्यात नोकरीला आहेस तर मी तुझ्या नोकरीवर गदा आणेन. तुझ्या मागे चौकशी लावेन. मी सस्पेंड झाल्यामुळे तुलाही सस्पेंड करेन. तुला सुखाने जगू देणार नाही व जर तू माझा धर्म स्वीकारला नाही तर मी तुला तलाक देईन. माझ्या धर्मात चार लग्न करण्यास परवानगी आहे. त्यामुळे मला तुझी गरज नाही तसेच वारंवार पैशाची मागणी करुन पैसे दे नाहीतर तलाक दे असे म्हणून छळ केला, तसेच फिर्यादीच्या परस्पर दिनांक २ ऑगस्ट २०२४ रोजी आयशा शेख हिच्याशी लग्न केले असे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून सातजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि विक्रांत हिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि नवनाथ धनवडे व अंमलदार अशोक तांबे करीत आहेत.

## पान सहा वरून

### धोंडराई परिसरातील

फ संबंधित मोबाईल कंपनी केबलसाठी धोंडराई परिसरात मात्र रस्ते पोखरत आहेत. त्या ठिकाणी हा प्रकार सुरू राहिल्यास पाईप लाईन सोबत रस्ते धोकादायक होणार आहेत. अनेक ठिकाणी अपघात होणार आहेत. त्यामुळे पावसाळ्याच्या तोंडावर सुरू असलेले काम रोखण्यासाठी जिल्हाधिकारी प्रशासन किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग नेमकी काय भूमिका घेतो? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### फारोळा–म्हारोळा रस्त्याचे

गावकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तर इतर वाहन चालकांना जाता–येता मोठी कसरत करावी लागत आहे. माजी पालकमंत्री तथा खासदार संदिपान भुमरे यांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष द्यावे अशी मागणी गावातील नागरिकांकडून होत आहेत.

### रक्तदान जगातले सर्वात

इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात बीड जिल्ह्यातील संघटनेतील कार्यकर्ते पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित राहून या असंख्य रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना, सूर्यकांत ठोकळ, अनिल वीर, विनोद सवाई, आकाश ढोकणे, आकाश वारभुवन, सुरज वाघमारे, वसीम भैया शेख, कावेरी जाधव, संघटनेतील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

### शेकापला मराठवाड्यात नविन

समिती सदस्यांच्या निवडी ही करण्यात आल्या. पक्षाचे सरचिटणीस म्हणून पुन्हा भाई जयंत पाटील निवड झाली आहे.शेतकरी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर वीस वर्षांपासून सातत्याने शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून संघर्ष करणाऱ्या केजचे भूमिपुत्र भाई मोहन गुंड यांची राज्य चिटणीस मंडळात नव्याने संधी मिळाली आहे, यामुळे सर्व पक्षातील तळागाळातील कार्यकर्ते पक्षाचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.काल झालेल्या पक्षाच्या अधिवेशनात मला पक्षाने राज्य चिटणीस मंडळात घेऊन राज्यभर काम करण्याची संधी दिली,शेतकऱ्यांनी कामगारांची परिस्थिती खालावत चालली आहे. शेतकऱ्याच्या प्रश्नावर मराठवाड्यासह महाराष्ट्रामध्ये मोठी चळवळ उभी करून या लाल झेंड्याच्या माध्यमातून लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी पूर्ण प्रयत्न करणार,लोकांना आता खरी गरज शेकापक्षाच्या विचारची आहे. –भाई मोहन गुंड राज्य चिटणीस मंडळ सदस्य शेकाप.

### कडा येथे राबविण्यात

असे प्राचार्य डॉ हरिदास विधाते यांनी सांगितले.पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी परमेश्वर तांदळे व एस. आर पी. एफ मध्ये निवड झालेल्या सोहेब शेख यांचा सत्कार करण्यात आला.प्रा गोरे प्रथम रक्तदान केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सुत्रसंचलन प्रा ओव्हाळ यांनी केले. उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ भास्कर चव्हाण यांनी मानले.

### शेतकऱ्यांनी तंत्रज्ञानाचा अवलंब

करून मधुकर लोटन पाटील यांच्या स्वदेशी कपाशी लागवडीची पाहणी केली तसेचमौजे जरंडी येथे अति घन पद्धतीने लागवड केलेल्या पेरू बागेची पाहणी केली तसेच मोसंबी बागे मध्ये जास्तीत जास्त फळधारणा होण्याबाबत मार्गदर्शन केले यावेळी हेमंत पाटील मधुकर पाटील कृषी भूषण शेतकरी रवींद्र पाटील,प्रदीप पाटील डॉ अविनाश पाटील,नरेंद त्रंबक पाटील ,विजय पाटील,दिलीप पाटील कृषी पर्यवेक्षक समाधान चौधरी मयूर बारे आदींची उपस्थिती होती.

### आरटीओ कार्यालयात

निवेदनाद्वारे वंचित बहुजन आघाडी अंबाजोगाई च्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे बीड जेष्ठ नेते मारोती सरवदे रामराजे सरवदे जिल्ह्याचे प्रसिद्धी प्रमुख सुशांत धावरे युवा बीड जिल्ह्या संघटक सरवदे रत्नदीप डावरे, नंदकुमार वाघमारे, विशाल जोगदंड,रवि गायसमुद्रे,साहिल गोमसाळे, ई. कार्यकर्त उपस्थित होते.

### शिवसेना सदस्य नोंदणीला

श्रीफळ फोडून चिंचोली माळी, वरपगाव येथे शिवसेना प्राथमिक सदस्य नोंदणी अभियानाला प्रारंभ करण्यात आला..! या सदस्य नोंदणी अभियानात शिवसैनिकाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला तसेच सर्वसामान्य गावकरी व शेतकरी यांनीही मोठ्या प्रमाणात शिवसेना सदस्य नोंदणी सहभाग घेतला यावेळी बीड शिवसेना जिल्हा सचिव रोहित कसबे, युवा सेना विधानसभा प्रमुख ज्ञानेश्वर भैय्या बोबडे, उपशहर प्रमुख अशोक कोल्हे, तालुका संघटक लक्ष्मण तात्या गलांडे, शाखाप्रमुख चिंचोली माळी राजेभाऊ, शाखाप्रमुख वरपगाव प्रदीप देशमुख, शाखा सचिव आप्पा कांबळे, अण्णासाहेब देशमुख, जय रमेश देशमुख, अरुण देशमुख बाळासाहेब देशमुख , दिनेश देशमुख विठ्ठल खंदारे, सुंदर अण्णा देशमुख व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

### नवनियुक्त अधिकारी

सचिन जगताप यांनी केले. प्रास्ताविक रा.काँ.चे शहराध्यक्ष बाळासाहेब गुजर यांनी केले. यावेळी उबाठा गटाचे शिवसेना जिल्हा संघटक रतन गुजर, सर्जेराव खटाणे, अर्जुन बहिरवाळ, बबन बहिरवाळ, बबन चौधरी, सरपंच सुभाष बहिरवाळ, गणेश बहिरवाळ, पशुसंवर्धन अधिकारी पंकज बहिरवाळ, रमेश येवले, सरपंच महादेव नेहराळे, वनपाल आनंद बहिरवाळ, योगेश बहिरवाळ यांच्यासह पदाधिकारी, समाजबांधव उपस्थित होते.

समाजातील २५ हून अधिक तरुण शासकीय सेवेत

सेवापुर्तीबद्दल सहाय्यक फौजदार राम बहिरवाळ यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, नवनियुक्त अधिकाऱ्यांमध्ये सा.बां.विभागातील शाखा अभियंता पूजा डोंगर, जि.प. बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता संतोष खटाणे, बँक उपव्यवस्थापक बालाजी, शिक्षक रामेश्वर बहिरवाळ, वनपाल योगेश बहिरवाळ, क्रीडा शिक्षक संतोष डोंगर यांच्यासह २५ हून अधिक जणांचा सत्कार करण्यात आला.

### सत्यशोधक महोत्सव

वाघमारे, दिपक शेरकर, राहुल हिवाळे, विकास जाधव, विजय शेरकर, विष्णु कांबळे, बळी वैराळे, जगदीश थोरात, नितीन गायकवाड, मधुर ताटे, सनी शेरकर, बबलु शेरकर, शंकर आलाट, बालाजी आलाट, गणेश आलाट, सुनिल अवचार, बाळु अवचार, यांनी परिश्रम घेतले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# बाबासाहेब अन् अण्णाभाऊंची तीनवेळा भेट!

## अॅड.तेजस वडमारे : बलभीम नगर बुद्ध विहारात जयंती

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती निमित्त बलभीम नगर बुद्ध विहार शिवाजीनगर बीड येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेच्या वतीने बलभीम नगर बुद्ध विहार येथे शाखा क्र.१ च्या उद्घाटनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, यावेळी शाखेचा उद्घाटना सोबतच बीडमध्ये वाचाल तर वाचाल या बाबासाहेबांच्या संदेशाला आदेश मानून आयु डी जी वानखडे बाबा यांच्या संकल्पनेत आणि प्रयत्नांतून फिरते मोफत वाचनालय केंद्र क्रमांक ३८ वे चे उद्घाटन समारंभ आयोजित होता सोबतच आयु डी जी वानखेडे बाबा यांनी लहान मुलांना बुद्ध वंदनेचे आणि लहान मुलांना उपयुक्त अशा महापुरुषांच्या जीवनावरील आधारित पुस्तक वाटप केले.



कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे अण्णाभाऊ साठे आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील वैचारिक साम्य या विषयावर व्याख्याते म्हणून लाभलेले बीड जिल्ह्यातील प्रचलित आणि प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते बबनजी वडमारे साहेब यांनी या विषयाला अगदी योग्य न्याय दिला आणि श्रोत्यांमध्ये या विषयावर विस्तृत आणि अभ्यासक मत मांडले. साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे आणि बाबासाहेबांचा वैचारिक वारसा एकच होता हे सांगताना फकीरा नायक आणि पुणे करारातील बाबासाहेब यावर विस्तृत मार्गदर्शन केले.

अण्णाभाऊ ची आणि बाबासाहेबांचे तीन वेळा भेट झाली होती यावर लिखित पुरावे मांडून वडमारे साहेबांना बाबासाहेबातील आणि अण्णाभाऊ मधील संबंध हे किती जवळचे होते हे सिद्ध केले. आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे याच भेटी दरम्यान बाबासाहेबांची आणि अण्णाभाऊंची चर्चा आणि अण्णाभाऊन्ना कशी लोकशाहीर ही पदवी बाबासाहेबांनी दिली. आणि कसे अण्णाभाऊ जागतिक लेवलला कीर्तिमान स्थापित करू शकले, या अशा अभ्यासू विषयावर आयु बबन भाऊ वडमारे यांनी अगदी सोप्या भाषेत सर्वांना मंत्रमुग्ध करून टाकले. विशेष म्हणजे त्यांनी दिलेले लिखित पुस्तकांचे पुरावे हे त्यातील महत्त्वाचा भाग होता. या कार्यक्रमासाठी विशेष म्हणजे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ऍड हनुमंत परमेश्वर कांबळे सर यांनी विराच्या बाहेरील नाली वरून जाण्यासाठी लहान मुलांना व वयोवृध्द महिलांना विहरात जाण्यासाठी पाच मोठया फर्शाचे दान देऊन मार्ग सुखकर केला त्याबद्दल महीला मंडळाकडून त्याचे आभार मानले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ड. केतन गायकवाड,(शहराध्यक्ष. भा. बौ. महासभा, बीड) प्रमुख पाहुणे म्हणून ड. हनुमंत परमेश्वर कांबळे, (उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापुर) हे लाभले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून आयु, व्हि. एन. निसर्गंध साहेब, (विभागीय सचिव छ. संभाजीनगर विभाग), आयु, अमरसिंह ढाका साहेब (जिल्हा कौषाध्यक्ष. भा. बौ. महासभा, बीड),आयु. यशवंत कदम सर (तालुकाध्यक्ष. भा. बौ. महासभा, बीड.) भारतीय बौद्ध महा शहर चे आयु संतोषजी जोगदंड, बौद्धाचार्य सदाशिव अण्णा कांबळे हे उपस्थित होते. तसेच निसर्गंध ताई, (जिल्हाध्यक्ष भा बौ म, बीड) ज्येष्ठ पत्रकार डोंगरे साहेब, बौद्ध महासभेचे सूर्यवंशी साहेब या सुद्धा उपस्थित होत्या. विशेष करून उपस्थिती दर्शविलेल्या त्रिरत्न बुद्ध विहार पंचशील नगर बीड येथील महिलांचे संख्या दर्शनीय होती.या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणून देविदास राऊत सर, आयु अण्णासाहेब शेळके सर, आयो धर्मराज मुजमुले साहेब, ड. चंद्रवधन जाधव, जोगदंड सर, आझाद समाज पार्टीचे आयु आशिष कुमार चव्हाण, प्राध्यापक सुतार सर, पत्रकार सुनीलजी डोंगरे सर, संपादक दीपक थोरात, नीतीन मजमुले उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजक ड. तेजस वडमारे, अंजली तेजस वडमारे, अंजली विशाल वाघमारे, जयश्री विशाल वडमारे, स्वाती अमर वडमारे, आंचल अमर वडमारे, माधवी वडमारे,कोमल प्रकाश वाघमारे, सुजाता इंदर वाघमारे, सह्याद्री नितीन भालेराव, सरिता गौतम खेमाडे, दिपाली अजय जाधव, सोनाली अनिल अंकुटे, आशा राजू धन्वे, किरण राम वडमारे, क्रांती संजय धन्वे, वनीता सुरेश अंकुटे, सांची राम वडमारे, जयश्री गवळी, कमलबाई अंकूटे, आशाबाई खेमाडे, हेमाबाई वडमारे, हौसाबाई वाघमारे, मालन अंकुटे गौतम खेमाडे ,अजय जाधव, आर्यन साळवे, अनिल अंकुटे, सचिन वाघमारे,सिद्धार्थ विद्यागार, करण वाघमारे, मंगेश वडमारे,बन्सी वाघमारे, निवृत्ती वाघमारे,आयु. संतोष जोगदंड, व बलभीम नगर, मित्र नगर, शिवाजीनगर येथील सर्व बौद्ध उपासक उपसीका बालक बालिका व भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेचे व बलभीम नगर शाखेचे सर्व पदाधिकारी हजर होते.

# बेलेश्वर महादेव मंदिरात रांगा



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहराजवळ असलेल्या बेलेश्वर महादेव मंदिरात पहिल्याच श्रावण सोमवारी भाविकांनी दर्शनासाठी रांगा च रांगा होत्या सोयगाव शहरापासून सुरू झालेल्या अजिंठ्याच्या डोंगर रांगेत हे बेलेश्वर महादेव मंदिर आहे विस्तीर्ण घनदाट जंगलात डोंगराच्या उंचीवर हे मंदिर वसलेले आहे डोंगराच्या पायथ्यापासून भाविकांना चढण्यासाठी पायऱ्या करण्यात आलेल्या आहे पहिल्याच श्रावण सोमवारी या महादेव मंदिरावर भाविकांची मोठी गर्दी झाली होती श्रावण महिन्यात या ठिकाणी नवस फेडले जातात त्यामुळे श्रावण सोमवारी येथे डाळ बट्टी चा बेत असतो पहिल्या श्रावण सोमवारी या ठिकाणी नवस फेडण्यासाठी मोठया संख्येने नागरिक आले होते पहिल्या च श्रावण सोमवारी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.




**दिंद्रुड :** येथील भगवान वाघ यांचे आकाली निधन झाले.त्यामुळे माधव निर्मळ यांनी वाघ कुटुंबाची भेट घेत सांत्वन केले.

# पतसंस्थेची वैभवशाली परंपरा अविरत!

## नियोजन : अमृतेश्वर शिक्षक पतसंस्थेची सभा



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव येथीलअमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्थाची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन कृष्णा पाटील यांचे अध्यक्षतेखाली सोमवारी पार पडली. प्रमुख पाहुणे म्हणून भटकर (उपसंचालक, पुणे, प्राचार्य डायट, बुलढाणा) फिरोज तडवी (के.प्र.) राठोड (मु अ प्रशाला), दिलीप रावणे आदी उपस्थित होते. दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने सभेला सुरुवात करण्यात आली.या वर्षातील मयत सभासद बंधू भगिनी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

तालुकतील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक ,सेवानिवृत्त शिक्षक,१० वी ,१२ वी, प्राविण्य मिळविलेले विध्यार्थी, विविध स्पर्धा परीक्षा मध्ये गुणवंत विध्यार्थी, त्यांचे शिक्षक, पालक यांचा ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक शेख शकुर यांनी केले. भटकर, फिरोज तडवी यानी मनोगत व्यक्त केले. भास्कर चौधरी, दिवाकर चोपडे , अनिल निकम राजेश जंजाळ यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात पाटील सर यांनी सभेला संबोधित करत पतसंस्थेच्या वैभवशाली परंपरा, संस्थेची सुरू असलेली प्रगती अहवाल वर्षांतील प्रगतिदर्शक आकडेवारी, भविष्यात करावयाचे पतसंस्था सभासद यांची माहिती दिली

याप्रसंगी वडगाव केंद्राच्या वतीने केंद्रीय मुख्याध्यापक श्री सोनवणे व संस्थेचे माजी चेअरमन रविंद्र पाटील यांचे हस्ते चेअरमन कृष्णा पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला.संस्थेचे सचिव श्री.फुसे सर यांनी विषयपत्रिकेचे वाचन करून सभासदांच्या संमतीने निर्णय करण्यात आले.

सभेस उपाध्यक्ष रघुनाथ काटोले, मानद सचिव संदिप सोनवणे, संचालक दुर्गादास बलांडे, संतोष वाघ, विठ्ठल राठोड, पंकज रगडे, शकुर शेख, संदिप चौधरी, समाधान चोपडे, महादू नगरे, किरण पाटील, महेश गवांदे श्रीमती सुनिता सोळुंके, शोभा पाटील यांचेसह सभासद शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते सूत्र संचालन संदिप चौधरी यांनी केले तर आभार रघुनाथ काटोले यांनी केले राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली.

# खालापुरी विद्यालयात शिक्षण सप्ताहानिमित्त विविध उपक्रम

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षकाचे मौलिक परिश्रम आदर्श माध्यमिक विद्यालयात शिक्षण सप्ताह अतिशय जल्लोषात सादर करण्यात आला महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने आदेशित केलेल्या शिक्षण सप्ताहाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षकांचे परिश्रम महत्त्वाचे ठरले असून अत्यंत उत्साही वातावरणामध्ये शिक्षण सप्ताह साजरा करण्यात आला दिनांक २२ जुलै ते २८ जुलै या कालावधीमध्ये रोज नवीन उपक्रम घेऊन सांस्कृतिक कौशल्य विकास वृक्षारोपण स्नेहभोजन इत्यादी उपक्रम राबविण्यात आले .



शिक्षण सप्ताहातील शेवटच्या दिवस म्हणजे स्नेह भोजन मुलांना पौष्टिक आहार देण्यात आला यामध्ये ड्रायफूट चा पण उपयोग केला मुलांना अन्न हे परब्रह्म ह्या वाक्यानुसार अन्नाचे महत्त्व सांगण्यात आले पौष्टिक आहार सकस आहार यातील विटामिन पोषक घटक यांची माहिती सांगण्यात आली.

अतिशय उत्साही व आनंदी वातावरणात शिक्षण सप्ताह मोठ्या जल्लोषात पार पडला हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक सोनसळे बी बी सर, दादा साहेब,कंडाळे राठोड सर, गणगे सर, नेहरकर सर, बागडे सर,भोसले सर, पाखरे सर,कंटाळे सर, वनवे सर, बांगर शरद सर आंधळे काका, पवार मॅडम, दळवी मॅडम यांनी मोलाचे परिश्रम घेतले व कार्यक्रम खूप उत्साही वातावरणात पार पडला

# हायकोर्टातील याचिका मागे घ्या

## सचिन मुळूक : जनतेला त्रास देऊ नका हात जोडून विनंती

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करून शिवसेनेने शहरातील स्वराज्य नगर मधील रस्त्यांच्या कामासाठी निधी मंजूर करून आणला. मात्र आमदार संदीप क्षीरसागर यांनी हायकोर्टात याचिका दाखल करून विकास कामे आडविली. बीडमध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या पावसा मुळे स्वराज नगर भागातील नागरिकांची रस्त्या अभावी हाल होत आहेत. आमदार साहेब स्वराज नगर भागातील नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका. या भागातील रस्ता कामांसाठी हायकोर्टात तुम्ही टाकलेली याचिका मागे घेऊन स्वराज नगरमधील विकास कामांचा मार्ग मोकळा करावा, अशी हात जोडून विनंती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी आमदार संदीप क्षीरसागर यांच्याकडे यांना केली आहे. शहरातील स्वराज्यनगर, शिवाजीनगर , गणपतीनगर भागाचा दिवसेंदिवस विस्तार होत आहे. सर्व समाजातील लोक या भागात गुण्यागोविंदाने अनेक वर्षांपासून राहत आहेत.रस्ते नसल्याने रहिवाश्यांना दैनंदिन कामे करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

# कट्टे हॉस्पीटलमध्ये हाडांसाठी शिबिर

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये हाडाची ठिसुळता (ऑस्टिओपोरोसीस) मोफत तपासणी शिबीर येत्या गुरुवार दि ८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजीत केले आहे त्याचा लाभ घेण्याचे आवाहन कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये वतीने करण्यात आले आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, हाडाची ठिसुळता (इचऊ) ही वयाच्या चाळीशीनंतर स्त्री व पुरुष या दोघांमध्ये आढळते. हाडाची ठिसुळता म्हणजे हाडांतील कॅल्शिअम कमी होवून हाडे ठिसुळ व कमकुवत बनतात आणि यामुळे पुढे वरचेवर फ्रॅक्चर व सांधेदुखीचे वयाबरोबर वाढलेले प्रमाण वाढते. स्त्रीयांना रजोनिवृत्तीनंतर वाढत्या वयाबरोबर हाडातील कॅल्शिअमचे प्रमाण ३० ते ४० टक्केपर्यंत कमी झालेले आढळते. हाडाची ठिसुळता याच्याकरिता उपचार पद्धती उपलब्ध आहेत. बाहेर इतरत्र ठिकाणी या तपासणीसाठी १५०० ते २००० रुपये खर्च येणारी ही तपासणी मोफत असून या सुवर्णसंधीचा लाभ घेवून आपल्याला भविष्यात होणार्या हाडांच्या आजारावर मात करण्यासाठी मात करण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक कट्टे ऑर्थो पेडीक हॉस्पीटलकडून करण्यात आले आहे. सदरील शिबिर कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटल, आदर्श नगर,तहसील ऑफीस रोड, बीड येथे होणार आहे.

## निसर्ग : धरणात येणाऱ्या पाण्याविषयी अफवांचा बाजार

# नाथसागर धरणात १३ टक्के पाणीसाठा

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठवाड्याच्या शेतीसाठी व औद्योगिक नगरी साठी वरदान ठरलेले पैठण येथील नाथसागर धरणात गेल्या दोन आठवड्यापासून पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात सुरू असून सोमवार दि.५ रोजी सकाळी या नाथसागर धरणात ४२ हजार ३३२ क्युसेक पाण्याची आवक सुरू आहे.

यामुळे ४ टक्के पाणी असलेलं धरण १३.९० टक्के भरला असून. मराठवाड्यातील शेतकऱ्यासह नागरिकांना नाथसागर धरण यावर्षी भरणार का अशी चिंतेना त्रस्त असलेल्या शेतकरी व नागरिकांना गेल्या दोन दिवसापासून धरणाच्या वरील भागातून येणाऱ्या पाण्यामुळे मोठा दिलासा मिळाला असून. सोमवार रोजी या नाथसागर धरणाची पाणी पातळी १५००.४६ फुटा नोंद करण्यात आली. सध्या पाण्याची टक्केवारी १३.९० आहे. दि.१ जून पासून २५६.४७१० दलघमी पाणी जमा झाले आहे.पैठण तालुक्यातील विविध महसूल मंडळात अधून मधून पडणाऱ्या पावसामुळे काही प्रमाणावर धरणातील पाणी साठा वाढविण्यासाठी हातभार लावल्या जात असून. परतीच्या मोठ्या प्रमाणावर पाऊस पडल्यास नाथसागर धरणात पाण्याची पातळी समाधानकारक राहील अशी अपेक्षा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव, धरण उपविभागीय अभियंता विजय काकडे यांनी व्यक्त केले आहे.



नाथसागर धरणाच्या वरील भागातून मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक मिळत असल्याचे अफवा काही व्यक्ती सोशल माध्यमावर पसरत असून शेतकरी व नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या वतीने अधिकृत नोंदीवर विश्वास ठेवा असे आवाहन पाटबंधारे विभागाकडून करण्यात येत आहे.

# जागतिक स्तनपान सप्ताह साजरा!

## आरोग्य : स्तनमातांना करण्यात आले मार्गदर्शन



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज येथील उपजिल्हा रुग्णालयात जागतिक स्तनपान सप्ताह साजरा करण्यात आला. गुरुवार रोजी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. स्तनदा मातांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ केंद्रे यांनी स्तनपान या विषयावर मार्गदर्शन केल . आहार तज्ञ सुलक्षणा पाटील यांनी आई व बाळासाठी स्तनपानाचे महत्त्व सांगितले. स्तनदा मातेच्या आहाराविषयी मार्गदर्शन केले. समुपदेशक सीता गिरी यांनी स्तनपानाच्या वेगवेगळ्या पद्धती विषयी मार्गदर्शन केले व श्रीमती जगताप यांनी स्तनपानाविषयी मार्गदर्शन केले. चित्रफित, चार्टच्या माध्यमातून मातांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास स्तनदा मातांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सचिन वाझेच्या आरोपांनी खळबळ

राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी गंभीर आरोप केल्यानंतर त्यांच्या दाव्यांवर संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. त्याची खात्री पटवणारे आरोप सचिन वाझे याने केले आहेत. सध्या तुरुंगात असलेला सचिन वाझेने म्हटले आहे की, देशमुख हे आपल्या पीएमार्फत पैसे घ्यायचे आणि त्याचे पुरावेदेखील सीबीआयकडे असल्याचा वाझे याने खळबळजनक आरोप केल्यानंतर देशमुख यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

सचिन वाझे हे उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या जवळचे होते. त्यांच्या म्हणण्याला अर्थ आहे, त्यांच्या आरोपांनाही अर्थ आहे; पण केवळ एका व्यक्तीने केलेले आरोप एवढ्यावर हे प्रकरण संपवता येणार नाही. सचिन वाझे याने आताच केलेले आरोप हे साधेसुधे नाहीत, तर ते एक पोलीस अधिकारी राहिलेल्याने महाराष्ट्राच्या माजी गृहमंत्र्यावर केलेले आरोप आहेत, त्यामुळे त्यांना गांभीर्याने घ्यायला हवे. हे मुळात सारे प्रकरण महाविकास आघाडीच्या काळातील आहे. तेव्हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते. त्यांनी आपल्या आपल्या खास शिफारशीने सचिन वाझेला महाराष्ट्राचे पोलीस अधिकारी बनवले होते. सचिन वाझे हा अँटिलिया स्फोटक प्रकरण आणि मनसुख हिरेन हत्येच्या प्रकरणात आरोपी आहे. त्याच्या आरोपांना महत्त्व आहे. सचिन वाझे म्हणतो की, "गृहमंत्री देशमुख त्यांच्याबद्दलचे पुरावे सीबीयकडे आहेत आणि आपण कधीही नार्को टेस्टला तयार आहोत. वाझेच्या म्हणण्याला निश्चित महत्त्व आहे आणि सरकारने त्या दृष्टीने आता तपास करावा म्हणजे यातून 'दूध का दूध आणि पानी का पानी बाहेर येईल' हेच खरे...!" वाझे पुढे म्हणतो की, "मी देवेंद्र फडणवीस यांना पत्रही लिहिले आहे आणि यावरून राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

भाजपाच्या नेत्यांनी अनिल देशमुख यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे आणि हे साहजिक आहे. भाजपा नेते देशमुख यांच्यावर संतापणार, हे उघड आहे; कारण देशमुख हे आपल्या पीएच्या माध्यमातून पैसे घेत होते. भाजपा नेत्यांनी अनिल देशमुख यांच्यावर टीकेची झोड उठवावी, यात काही नवल नाही; पण यावरून राज्याच्या राजकारणात ठाकरे यांच्या काळात किती घाणेरडे राजकारण खेळले जात असेल आणि तेही पोलीस अधिकाऱ्यांना हाताशी धरून केले जात आहे, याचे प्रत्यंतर पुन्हा आले आहे.

देशमुख यांनी नुकतेच फडणवीसांवर गलिच्छ आरोप केले होते, त्यांना सचिन वाझेच्या उत्तराने परस्परच उत्तर मिळाले आहे. देशमुख यांच्या आरोपांनी राज्यातील वातावरण तापले होते आणे वेगवेगळे पक्ष आपल्या भूमिका घेत होते; पण सचिन वाझेच्या खुलाशाने आणि केलेल्या आरोपांनी देशमुख यांचे तोंड तर फोडले आहेच; पण देशमुख यांच्या खंडणी प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणी प्रतिक्रिया देताना भाजपा नेत्यांनी टीकेची झोड उठवली आहे, त्यांच्या प्रतिक्रियांना तितकेसे महत्त्व दिले गेले नाही, तरीही देशमुख यांच्या आरोपांनतर जो काही गदारोळ उठला आहे, तो महत्त्वाचा आहे. कारण कोविडच्या काळात घडलेला हा प्रकार आहे. या काळात कोविडचा आडोसा घेऊन, सरकार काय भयंकर प्रकार करत असेल, याची चुणूक यांमुळे दाखवून दिली आहे.

सचिन वाझेला तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा आशीर्वाद होता, त्यामुळे सचिन वाझेच्या आरोपांची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी भाजपा नेत्यांनी केली आहे. रिलायन्सचे मुकेश अंबानी यांच्या घरासमोर स्फोटके ठेवण्याचे काम कुणी केले आणि मनसुख हिरेनची हत्या कुणी केली याचा तपास लावण्यासाठी आता या संपूर्ण प्रकरणाची नव्याने चौकशी झाली पाहिजे. या भाजपाच्या मागणीत तथ्य आहे. चौकशी केल्यामुळे अनेक बाबी उघड होणार आहेत, त्यामुळे या चौकशीतूनच मुकेश अंबानी यांच्या घरासमोर स्फोटके ठेवण्याचे काम कुणी केले आणि मनसुख हिरेन याची हत्या कुणी केली याचा तपास लागणार आहे, त्यामुळे सचिन वाझेच्या म्हणण्याची पूर्ण चौकशी होऊन, खरे काय ते समोर आलेच पाहिजे; कारण यातच राज्याचे हित आहे.

भाजपा नेत्यांच्या आरोपांमध्ये एक बाब मात्र लक्षणीय आहे आणि ती म्हणजे आरोपांचे सातत्य. ज्याप्रमाणे सचिन वाझे म्हणतो की, माझी नार्को टेस्ट करा, त्याप्रमाणे देशमुखांवर सचिन वाझेने केलेल्या आरोपांमुळे तत्कालीन सरकारचा आणि देशमुख यांचा बुरखा टराटरा फाटला आहे. ठाकरे यांचे सरकार असताना पैसे मागितले जात होते आणि ते सचिन वाझेच्या आरोपांनी पुरेपूर उघड झाले आहे, हे सत्य समोर आले आहे. तत्कालीन ठाकरे यांचे सरकार किती गलिच्छ होते आणि किती बरबटलेले होते याचे पुरावेच समोर आले आहेत. ठाकरे यांचे सरकार सत्तेत असताना सारा अंदाधुद कारभार होता आणि प्रत्येक कामासाठी पैसे मागितले जात होते, याचे पुरावेच समोर आले आहेत. सचिन वाझेच्या आरोपांनी या चर्चेला पुष्टी मिळाली आहे. आता या प्रकरणाची सर्व तपशीलवार चर्चा झाली पाहिजे म्हणजे यातील नक्की काय ते जनतेला कळेल आणि या प्रकरणातील खरे पडद्यामागील चेहरे समोर येतील. तत्कालीन शिवसेनेचे (ठाकरे गट) सरकार किती किळसवाणे होते आणि बरबटलेले होते हे समोर आलेच आहे. आता त्यावर चौकशीने संपूर्ण शिक्कामोर्तब करावे. ठाकरे यांचे सरकार किती पाताळयंत्री होते, याचे कित्येक पुरावे आहेत, आता हा यातील आणखी एक पुरावा आहे.

# मुंबईतील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस भयानक

## मुंबई डॉट कॉम

**अल्पेश म्हात्रे**



गेल्याच आठवड्यात मुंबईतील सायन रेल्वे स्थानकावरील पूल बंद झाला आणि मुंबईकरांनी पुन्हा एकदा अभूतपूर्व वाहन कोंडी अनुभवली. हा त्रास आता तब्बल अडीच वर्षे मुंबईकरांना सहन करावा लागणार आहे, ही आणखी एक भयंकर गोष्ट आहे. मुंबई ही तिच्या समृद्ध वारशासाठी ओळखली जाते; आता ती सध्या बारमाही वाहतूक कोंडीने त्रस्त अशीही ओळखली जाऊ लागली आहे. मुंबई हे जगातील सर्वात वाईट रस्त्यांवरील रहदारीचे शहर आहे, ते पाचव्या क्रमांकाचे सर्वाधिक गर्दीचे शहर आहे. मुंबईतील वाहतुकीची स्थिती सातत्याने बिघडत चालली आहे. शहराचा गर्दीचा दर, प्रवासात घालवलेला सरासरी वेळ, बेसलाइन नॉन-कंजेस्टेड पातळीपेक्षा ५३ टक्के जास्त होता म्हणजे अर्ध्या मिनिटाच्या प्रवासाला गर्दीच्या वेळी २० मिनिटांपर्यंत जास्त वेळ लागतो. या वाहतूक कोंडीचे नागरिकांच्या वैयक्तिक आरोग्य आणि शहराच्या एकूण अर्थव्यवस्थेवर अनेक दीर्घकालीन प्रभाव पडत आहेत. वाहतूक कोंडीमुळे दिवसेंदिवस मुंबईचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे, हे यात सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. त्यात गेल्या सहा महिन्यांत वाहतूक कोंडीत १८ हजार वाहनांची भर पडली आहे. हे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. जानेवारी ते जून या सहा महिन्यांत शहरात गेल्या वर्षीच्या तुलनेत १८ हजार नव्या वाहनांची भर पडल्याने, मुंबईतील वाहतूक कोंडी आणखी वाढली आहे. मुंबईत सध्या ४८ लाख वाहने धावत आहेत. शहरात २ हजार किलोमीटरचे रस्ते आहेत, त्यात २५% रस्त्यांची विविध कामे सुरू आहेत. त्यामुळे शहरात वाहतूक कोंडीची आणखी भर पडली आहे. रिकव्हरमध्ये तर अक्षरशः तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत आहे. प्रवासासाठी लागणारा वेळ, इंधनावर होणारा खर्च त्यामुळे मनुष्याच्या कार्यक्षमतेवरही परिणाम होत आहे.

मुंबईच्या वाहतुकीची समस्या निर्माण करणाऱ्या असंख्य घटकांपैकी एक म्हणजे शहराचा भूगोल हे आहे. नवी दिल्ली आणि इतर शहरांमध्ये त्रिज्यात्मक भूगोल आहे, त्यामुळे ते बाहेरून वाढतात आणि एका स्थानाला दुसऱ्या स्थानाला अनेक मार्गांनी जोडतात. दुसरीकडे मुंबई तिन्ही बाजूने अरबी समुद्राने वेढलेली आहे, ज्यामुळे तिची वाढ मर्यादित आहे. उत्तर आणि दक्षिणेला जोडणारे पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्ग या दोनच प्रमुख महामार्गांमुळे गर्दीच्या वेळी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. आता त्यात भर पूर्व मुक्त मार्गाची व सागरीकिनारा मार्गाची म्हणजेच कोस्टल रोडची झालेली आहे. पूर्व मुक्त मार्गावर आता सकाळ व संध्याकाळी भयंकर वाहतूक कोंडी अनुभवास मिळते. तसेच कोस्टल रोड अजून अपूर्ण अवस्थेत असल्याने, सध्या पूर्ण असलेल्या रस्त्यांच्या सुरुवातीस व संपण्याचा ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. अशा प्रकारे सर्वच ठिकाणांवरून मुंबईची कोंडी होत आहे. याशिवाय मुंबईत ४.१ दशलक्ष वाहने रस्त्यावर आहेत, त्यामुळेही वाहतूक कोंडी होते. मुंबईतील कारची घनता प्रतिकिलोमीटर ६०० कारपर्यंत वाढली आहे, जी भारतात सर्वाधिक आहे. मुंबईच्या उपनगरात तर फूटपाथवरील अतिक्रमण, त्यात अरुंद रस्ते त्यामुळे गर्दीच्या वेळी प्रचंड वाहतूक कोंडी होते आणि शहर कोंडल्यासारखे होते. त्यात वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणावर शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणत आहेत.

सार्वजनिक वाहतुकीच्या पर्यायांबद्दल शहराच्या उपनगरीय रेल्वेवर जास्त भार आहे. दररोज ७५ लाख लोक रेल्वेने प्रवास करतात. त्यानंतर सर्वाधिक प्रवासी म्हणजे ३५ ते ३६ लाख प्रवासी बेस्ट बसचा वापर करतात. बेस्ट ही आधीच तोट्यात असल्याने, सध्या आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी संघर्ष करत आहे, त्यात कमी होत जाणारा बसताफा. बसताफा वाढवण्यात येणाऱ्या अडचणी पाहता, असलेल्या बस गाड्या वाहतूक कोंडीत अडकल्या कारणाने वेळेवर येत नसल्याने व येणाऱ्या बस या गर्दीने तुडुंब भरल्या असल्याने लोकांना हा पर्यायदेखील गैरसोयीचा वाटतो, त्यामुळे साहजिकच लोकांचा कल हा खासगी वाहनांकडे आढळून येतो, त्यामुळे स्वतःचे वाहन घेणे याकडे लोकांचा ओढा जास्त आहे, त्यातच कोरोना नंतर स्वतःच्या वाहनाची गरज हा पर्याय लोकांना जास्त आवडू लागला आहे. तिसरा पर्याय शहरातील मेट्रोसेवा. सुस्थापित मेट्रो नेटवर्कचा अभाव हे शहरातील वाहतूक कोंडीचे प्रमुख कारण आहे. सध्या मुंबई शहरात तीन मेट्रो सेवा सुरू आहेत व चौथी मेट्रो सेवा लवकरच सुरू होणार आहे. मेट्रोच्या सुरू असलेल्या बांधकामासाठी घेतलेल्या जागेमुळे शहरातील काही भागांमध्ये रस्त्यावरील मार्गांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीवर मर्यादा आल्या आहेत. मुंबईत आणखी नवीन पाच मेट्रो मार्ग सुरू होणार आहेत. मात्र ते सुरू झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होईल, अशी आशा बाळगणे मूर्खपणाचे ठरेल, कारण सध्याच्या मार्गांवर मेट्रो सेवा सुरू आहे. तेथील वाहतुकीवर कोणताही फरक पडलेला नाही, उलट दिवसेंदिवस वाहतूक कोंडीही वाढत आहे. मुंबईत देशातील एकमेव मोनो मार्ग सुरू आहे; मात्र म्हणून तेथील मार्गाचा विचार करता व त्यावरील प्रवाशांची संख्या पाहता वाहतूक कोंडी कमी होईल, अशी आशा बाळगणे भाबडेपणाचे ठरेल . नवनवीन येणाऱ्या गाड्यांचे प्रकार, लोकांकडे खुळखुळणारा पैसा त्यामुळे कोणताही सारासार विचार न करता व अनेक गाड्या रोज रस्त्यावर येत आहे व गर्दीच्या वेळेस सर्वच रस्त्यांवर अभूतपूर्वक कोंडी पाहावयास मिळत आहे.

या वाढत जाणाऱ्या वाहनांसाठी कोणतीही पार्किंगची सोय उपलब्ध नसल्याने, सर्रासपणे रस्त्यावर गाड्या उभ्या केल्या जात आहेत, त्यामुळे साहजिकच रस्त्यावरील मार्गिका या पार्किंगने अडवल्या जात आहेत त्यामुळे रस्त्यांची घनता कमी होत आहे. नुकतेच वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरणाऱ्या फेरीवाल्यांवरील कारवाई व न्यायालयाने सरकारला चांगलेच फटकारले आहे. लोकांसाठी चालणाऱ्या फूटपाथवर फेरीवाल्यांनी जम बसवल्यामुळे, लोकांना नाईलाजाने रस्त्यावरून चालावे लागते आणि त्यामुळे तेथील वाहतूक कोंडी होते. मात्र काही दिवस गेल्यानंतर मात्र पुन्हा फेरीवाले हळूहळू पथारी पसरू लागले आहेत. वाहतूक कोंडी वाढू लागली आहे. मुंबईत अनेक ठिकाणी मेट्रोची कामे अजूनही सुरू आहेत, त्यामुळे त्यांनी टाकलेले पसारे व पत्रांनी झाकलेले रस्ते यांमुळे वाहतूक कोंडी होत आहे. यात अग्निशमन दलाच्या गाड्या ॲम्बुलन्स मोठ्या प्रमाणात अडकत आहेत, यामुळे कित्येक लोकांचे नाहक बळी जात आहेत. मात्र सध्या या परिस्थितीकडे पाहायला कोणालाही वेळ नाही. मुळात वाहतूक कोंडी ही समस्याच असू शकते, याचे कोणाला भान नाही. जर मंत्रालयात अधिवेशनात येताना काही आमदार रस्त्यात अडकले. वाहतूक कोंडीत फसले, तर तेथील वाहतूक कोंडीत तत्काळ दूर केली जाते, मात्र एरवी सर्वसामान्यांना त्याच वाहतूक कोंडीत तासनतास अडकून पडावे लागते. गमतीचा भाग म्हणजे याच वाहतूक कोंडीत अडकल्याने व कुटुंबाला वेळ न देता आल्यामुळे कित्येक दाम्पत्याचे घटस्फोट झाले आहे, असे नुकतेच एका सर्वेक्षणात आढळून आले आहे.

दक्षिण मुंबईतील कनेक्टिव्हिटीमध्ये लक्षणीय सुधारणा करण्यासाठी डिझाइन केलेले मुंबई कोस्टल रोड प्रकल्प ज्यात एक भव्य रस्त्यांची रचना होती. दुचाकींसाठी आणि बस स्टॉपसह हा आठ पदरी प्रकल्प होता. प्रवासाचा वेळ ७० टक्क्यांनी कमी करून, ३४ टक्के इंधन वाचवण्याचा दावा केला गेला होता. या प्रकल्पामुळे मुंबईतील रहदारी मोठ्या प्रमाणात सुधारेल, अशी आशा होती म्हणजे दुसऱ्या अर्थी रस्त्यांची क्षमता वाढवणे आणि अधिक लोकांनी वाहन चालविण्यास प्राधान्य देण्यास होती. मात्र आता दुचाकीसाठी हा मार्ग रद्द करण्यात आला असून, सध्या बससाठी एक एक मार्किंग ठेवल्यास उर्वरित मार्गांवर त्याचा ताण येईल म्हणून हा विचारही बाजूला ठेवण्यात आला आहे. हे आपल्याकडे नियोजन कसे होते, त्याचे एक उदाहरण आहे.

जलद आणि सुरळीत प्रवासासाठी रस्त्यांची स्थिती सुधारणे, ही आवश्यकता आहे. मात्र मुंबईतील रस्त्यांची अवस्था पाहता, आपण कोणत्या जमान्यात राहतो, असा विचार पडतो. रस्ते प्रकल्पांवर करोडो रुपये खर्च करूनही, तसेच वर्षानुवर्ष टोलमार्फत करोडोंची वसुली करूनही मुंबईतील रस्त्यांची परिस्थिती सुधारत नाही, त्यात पावसात तर परिस्थिती आणखी बिकट होते. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते असा प्रश्न पडतो. पावसाळ्यात त्यावर तात्पुरती मलमपट्टी केली जाते, मात्र परिस्थिती जैसे थे राहते...! त्यात कसेही अनिर्बंधपणे बनवण्यात आलेले गतिरोधक काही ठिकाणी बसवलेले व उखडलेले ब्लॉक यामुळे वाहतूक कोंडी होते. रस्त्यावरील वाहनांची संख्या कमी करणे आवश्यक आहे.

# गावचा विकास का खुंटला...?





गावच्या विकासासाठी गावचे पोलीस पाटील व सरपंच यांची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. त्यासाठी ग्रामसेवक यांनी आपले काम प्रामाणिकपणे करणे गरजेचे आहे; कारण ग्रामसेवक हा गावच्या ग्रामसभेचा सचिव म्हणून काम पाहतात. बऱ्याच गावांत गटबाजी असल्याने, काही ठरावीक लोकांच्या हातात गावची सत्ता असते, तेव्हा आपल्या विश्वासातील व्यक्तीला सरपंच म्हणून निवडून आणतात. त्यांना गावाचे किंवा सरपंचपदाचे काहीही देणे-घेणे नसते. राव सांगेल तेवढे करायचे आणि गप्प बसायचे. गावचा विकास हा लोकसहभागातून करायचा असतो, मात्र तसे होताना दिसत नाही, त्यामुळे काही गावांचा फारसा विकास झालेला दिसत नाही. याचा परिणाम गावातील विकासकामे बाजूला आणि आतूनच धुसफूस सुरू असते. अलीकडे तर गावातील पोलीस पाटीलपदासाठी अर्ज दाखल करून सुद्धा त्या पैकी एकाची निवड न करता, इतर गावच्या पोलीस पाटील यांच्याकडे त्या गावच्या पोलीस पाटीलपदाची अतिरिक्त जबाबदारी दिली जाते, त्यामुळे त्या व्यक्तीच्या शिरोमुकुटात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला जातो. म्हणजे काही वेळा पोलीस पाटील म्हणून उत्तम काम करणाऱ्या व्यक्तीला दुसऱ्या गावचे पोलीस पाटील म्हणून जबाबदारी सोपविण्यात येते. याचा अभ्यास गावातील सुजाण नागरीकांनी करणे गरजेचे आहे.

आपल्या भारत देशाने मागील वर्षी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला; मात्र आजही देशातील गावांचा विचार केला, तर त्यांचा फारसा विकास झालेला दिसत नाही. याला अनेक कारणे असतील; मात्र जो विकास निधी आलेला असतो, त्याचा योग्य प्रकारे वापर केला जातो का? जर योग्य प्रकारे वापर केला गेला असता, तर गावचा विकास का खुंटला असता, असे म्हणण्याची वेळ आली नसती. मग शासकीय अनुदान जाते कुठे, याचा शोध लावणे गरजेचे आहे. असे मागील ७५ वर्षांत झालेले दिसत नाही. आजही काही गावात राव करील तो गाव काय करील! असे काम चालत असल्याचे पाहायला मिळते. यामुळे गावच्या विकासकामांना गती मिळत नाही. जर गावच्या विकासाला गती आली असती, तर असे लिहिण्याची वेळ सुद्धा आली नसती. त्याला मात्र हिरवे बाजार गाव अपवाद आहे. आपल्या राज्यातील अहमदनगर जिल्ह्यातील नगर तालुक्यामधील दुष्काळी हिरवे बाजार गावाने आज देशात एक आदर्श गाव म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. अशी ओळख इतर गावांची का झाली नाही, याचा विचार महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक नागरिकांनी करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक गावातील नागरिकांनी गटतट बाजूला ठेवून लोकसहभागातून काम केले पाहिजे म्हणजे राज्यातील प्रत्येक गाव हिरवे बाजार होण्याला वेळ लागणार नाही.

आपण प्राथमिक शाळेत असताना नागरिक शास्त्राच्या पुस्तकात शिकलो आहोत की, गावच्या विकासासाठी गावातील ग्रामपंचायतीच्या कामांचा विचार करता गावात चांगल्या प्रकारे रस्ते बांधणे, रस्त्यांची दुरुस्ती करणे, गावात दिवाबत्तीची सोय करणे, गावातील जन्म, मृत्यू व विवाह यांची त्वरित नोंद करणे, गावाची स्वच्छता राखणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे, पिण्याच्या पाण्याचा योग्यप्रकारे पुरवठा करणे, शिक्षण तसेच आरोग्यविषयक सोयी पुरवणे, शेती विकासाच्या व पशुधन सुधारणेच्या योजना अंमलात आणणे, गावचा बाजार, जत्रा, उत्सव यांची व्यवस्था करणे आणि महत्त्वाची बाब म्हणजे आपल्या ग्रामपंचायत हद्दीतील येणारे कर व शासनाकडून येणारा विकास निधी यांचा योग्य त्या कारणासाठी वापर करण्यात यावा. यासाठी ग्रामपंचायतीच्या वरील कामांचा बारकाईने विचार केल्यास, सर्व कामे महत्त्वाची आहेत. यातूनच गावाचा विकास होण्यास मदत होते. त्यासाठी प्राधान्यक्रमानुसार उपलब्ध निधीचा वापर करून, कामे पूर्ण करणे हे गरजेचे असते. हे आजही काही गावांमध्ये झालेले दिसत नाही. जर झाले असते, तर आज आपल्या देशाची परिस्थिती वेगळी दिसली असती.



**रवींद्र तांबे**

आजही काही गावांत रस्ता असला, तरी गावातील वाडीमध्ये जाण्यासाठी रस्ता नाही. गावातील सार्वजनिक ठिकाणेसुद्धा बंदिस्त दिसतात. गावात आपापसात कोर्ट-कचेऱ्या चालू आहेत. धार्मिक स्थळेदेखील बंद असताना दिसतात. कारण अशा ठिकाणी दिवाळी तसेच विविध कार्यक्रम होत असल्याने गावच्या ग्रामपंचायतीला महसूल मिळत असे. आता तो सुद्धा मिळत नाही. त्यामुळे राजकीय सत्ता असल्यास निधींची कमतरता नाही असे स्थानिक लोक बोलत असतात. मग गावचा विकास झालेला दिसून का येत नाही. मग सांगा अनेक कुटुंबे गाव सोडून शहराचा आधार का घेत आहेत. गावात अनेक घरे बंद असताना दिसतात, तर काही शाळांमध्ये मुलेच नाही. मग शाळेच्या इमारती उभ्या कशा राहणार. यासाठी शासन पातळीवर योग्य उपाय सुचविणे गरजेचे आहे. केवळ विकास निधी गावाला दिला म्हणजे त्या गावाचा विकास झाला असे म्हणता येणार नाही, तर त्यातून स्थानिक नागरिकांना त्याचा फायदा किती झाला हे महत्त्वाचे.

थोडक्यात, देशातील प्रत्येक गावचा विकास झाल्यास, देशाचा विकास होण्याला वेळ लागणार नाही. तेव्हा गावातील विकास कामांसाठी गटतट विसर्जित करून एकजुटीने कामाला लागले पाहिजे. गावात प्रशासक नेमून, विकासकामांवर झालेल्या खर्चाचा आढावा घ्यावा, तरच देशातील गावचा विकास जो खुंटलेला दिसतो आहे, त्या गावांचा विकास होऊन, देशाचा सर्वांगीण विकास होईल.

## राशिभविष्य

**सोमवार, ५ ऑगस्ट २०२४**

### || पंचांग ||

आजमिती श्रावण शुद्ध प्रतिपदा शके १९४६. चंद्र नक्षत्र आश्लेषा. योग व्यतिपात. चंद्र राशी कर्क. भारतीय सौर १४ श्रावण शके १९४६. सोमवार, दि. ५ ऑगस्ट २०२४. मुंबईचा सूर्योदय ०६.१६., मुंबईचा सूर्यास्त ०७.११., मुंबईचा चंद्रोदय ०६.४९., मुंबईचा चंद्रास्त ०८.०२., राहू काळ ०७.५३ ते ०९.३०. श्रावण मासारंभ, चंद्र दर्शन, द्वार यात्रा चिंचवड, श्रावणी सोमवार शिवपूजन शिवा मुठ तांदूळ.

### || भविष्य ||

**मेष :** नवीन उपक्रमात सहभागी होण्याची इच्छा होईल.

**वृषभ :** नोकरीमध्ये वातावरण चांगले राहील.

**मिथुन :** दिवास्वप्नात रमून राहू नका.

**कर्क :** व्यवसाय-धंद्यात आवश्यक ते फेरबदल करावे लागतील.

**सिंह :** सभा-समारंभाचे निमंत्रण मिळू शकते.

**कन्या :** आपल्या बोलण्याने इतरांची मने जिंकाल.

**तुळ :** समोरच्या व्यक्तीचा सल्ला उपयोगी पडू शकतो.

**वृश्चिक :** धनलाभाचे योग बनत आहेत.

**धनु :** काही मनाविरुद्ध निर्णय स्वीकारावे लागतील.

**मकर :** आवडत्या व्यक्तींचा सहवास लाभेल.

**कुंभ :** मनास आनंद देणाऱ्या वार्ता मिळतील. नवीन खरेदी होईल.

**मीन :** कुटुंबातील मुला-मुलींच्या कडून सुखद वार्ता मिळतील.

## जनसंवाद

### जनगणना लवकरात लवकर व्हावी

आरक्षणाचा मुद्दा प्रत्येक राज्यासाठी डोकेदुखी ठरलेला असतो. ज्या जातींना आरक्षण मिळालेले आहे, त्यांना ते कमी वाटते. काहींना आरक्षण मिळालेले नाही, ते आंदोलन करीत असतात. काहींना जाती-जमातींत आपण मागास असूनही आपल्याला आरक्षणाचा लाभ मिळत नाही. काही जातींना आपल्या जातींतून दुसऱ्या जातीला आरक्षण देऊ नये म्हणून विरोध करीत असतात. आरक्षण हा कधी न सुटणारा प्रश्न आहे. आता अनुसूचित जाती आणि जमातींच्या प्रवर्गातील जातींचे उपवर्गीकरण करून त्यांच्यात आरक्षणाची विभागणी करता येईल, राज्यांना त्यांच्या राज्यातील परिस्थितीनुसार त्यासाठी धोरण ठरविता येईल, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. २००४च्या सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय खंडपीठाचा अशा वर्गीकरणाचा प्रतिबंध करणारा निर्णय बदलत न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.
आरक्षणाच्या माध्यमातून कोणत्याही जाती प्रवर्गातील उपेक्षितांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली पाहिजे आणि त्या प्रवर्गातील सर्व जातींना ही संधी मिळावी, हे धोरण न्यायालयाने उचलून धरले, कारण शैक्षणिक आणि रोजगार अभिसरण प्रवर्गातील सर्व जातींपर्यंत पोहोचलेले नाही. तेव्हा या निकालाने केंद्र सरकारने लवकरात लवकर देशात जनगणना आणि तीही जातिगणनेसहित करायला हवी. देशात सुमारे १ हजार १०९ जाती येतात. महाराष्ट्रात अनुसूचित जाती सुमारे ११० आहेत. दुसरीकडे ज्यांनी आरक्षणाचा लाभ घेऊन आर्थिक आणि शैक्षणिक प्रगती साध्य केली तेच प्रत्येक वेळी आरक्षणाचा लाभ घेत आहेत. त्यांना यापुढे आरक्षणाचा लाभ मिळणार नाही. आता अनुसूचित जाती, जमातीमध्ये त्या त्या राज्य सरकारला स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन उपवर्गीकरण करता येईल. तसेच अनुसूचित जाती-जमातीच्या प्रवर्गाला देखील अप्रगत उत्पन्न गटाचे तत्त्व लावावे, असे न्यायालयाने म्हटले आहे. तसेच कोणत्या जातींना आणि किती टक्के आरक्षण द्यायचे, हे राज्य सरकारवर अवलंबून असणार आहे, त्यामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता देशात जातिगणनेशिवाय पर्याय नाही. तसेच याची अंमलबजावणी करताना कोणत्याही राज्य सरकारने राज्यघटनेने दिलेल्या नियमांचे भान ठेवून करायला हवे.

**- सुनील कुवरे,** शिवडी

### ईडी कारवाईचे भांडवल नको...!

देशात हाय प्रोफाईल आणि संवेदनशील राजकीय प्रकरणात साधारणतः ईडीसारखी उच्च स्तरावरील केंद्रीय तपास यंत्रणा कारवाई करते. या यंत्रणाच्या तपासणी प्रकरणी सर्वात अधिक बळी विरोधकांचा गेला आहे म्हणूनच विरोधकांनी त्यांच्या राज्यातच ठराव करुन सीबीआय आणि ईडीला तपासाला बंदी घातली आहे. संसदेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खा. राहुल गांधी यानी नुकताच 'एक्स' या सोशल मीडियावर पोस्ट टाकली आहे. ज्यात म्हटले आहे की, ईडी त्यांच्या घरावर छापा घालण्याच्या तयारीत आहे, अशी त्यांना माहिती मिळाली आहे. खा. राहुल गांधी यांची विधाने कायम वादग्रस्त असतात. उदाहरणार्थ मणिपूर, नोटबंदी, जातगणना आणि हिंदूना हिंसक म्हणणे इत्यादी इत्यादी... याच ईडी यंत्रणेनी दिल्लीच्या मुख्यमंत्री यांना देखील दोन महिन्यांपासून तुरुंगात टाकले आहे आणि आता खा. राहुल गांधी यांनी स्वतः म्हटले होते की, त्यांच्या घरावर ईडीचा छापा पडणार आहे. पण तसे काहीच घडले नाही म्हणून मग आता खा. राहुल गांधीनी त्यांच्यावर न झालेल्या ईडीच्या कारवाईचे पुन्हा विनाकारण राजकीय भांडवल यापुढे तरी किमान करू नये, असे मनापासून वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर,** कुर्ला

### नागरिकत्व सोडणाऱ्यांना रोखावे

गेल्या ११ वर्षांत सुमारे १६ लाख नागरिकांनी भारताचे नागरिकत्व सोडले असून त्यांनी इतर देशांमध्ये स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. गेल्या वर्षी २ लाख २६ हजार ६२० इतक्या नागरिकांनी भारतीय नागरिकत्वाचा त्याग केला. गेल्या दोन वर्षांत भारतीय नागरिकत्व सोडणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ का झाली आहे? ही मंडळी आपला देश सोडून का जात आहेत? बहुतांश लोक चांगले आयुष्य, जास्त पैसे आणि संधींच्या शोधात देश सोडून जातात. नागरिकत्व सोडणाऱ्यांची कारणे व्यक्तीपरत्वे वेगवेगळी असली, तरी त्याचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. जगभरातील गुंतवणुकदारांच्या नजरा आपल्या देशाकडे असताना देशातील मंडळी नागरिकत्व का सोडत आहे? असा प्रश्न गुंतवणुकदारांना पडू शकतो.
पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेच्या दिशेने भारत वाटचाल करताना देखील नागरिकत्व सोडले जात आहे. नागरिकत्व सोडल्याने जगात वेगळा संदेश जात आहे. देशात बेरोजगारी वाढल्याने, गेल्या दोन दशकांमध्ये मोठ्या संख्येने भारतीय नागरिक जगात वर्कप्लेसच्या शोधात परदेशात जात आहेत. विद्यापीठातील शिक्षण, नोकरी, मुलांचे करिअर आणि निवृत्ती यांसारख्या समस्यांचा विचार करूनच लोक भारत सोडत आहेत.

**- विवेक तवटे ,** कळवा

### हिंदू सणांचे पावित्र्य राखा !

आता चातुर्मास सुरू झाला आहे. श्रावण व भाद्रपद महिन्यात हिंदू सण भक्तिभावाने साजरे करण्याची आपली परंपरा आहे. या दिवसात भजन, कीर्तन, हरिपाठ करतात. श्रीकृष्णजन्मोत्सव, गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव साजरे करतात. मात्र गेल्या काही वर्षांत श्रीकृष्ण जन्मोत्सवाला स्पर्धा आणि चढाओढीचे स्वरूप देण्यात येत आहे. मुंबई, ठाणे, पुणे अशा शहरात जन्माष्टमी (गोविंदा) दिवशी भव्य व्यासपीठ उभारून हिंदी - मराठी कलाकारांना लाखो रुपयांची बिदागी देऊन बोलावण्यात येते व चित्रपट गीत व संगीताच्या तालावर डीजे लावून हिडीस नृत्य करण्यात येत असते. ते पाहण्यासाठी हजारो लोक जमतात. असे इतर कोणत्याही धर्माच्या धार्मिक सणात नसते. आपल्या हिंदू सनातन धर्मात मात्र गेल्या काही वर्षांपासून हे प्रकार चढाओढीच्या ईर्षेने वाढीस लागले आहेत . त्यामुळे हिंदू सणांचे पावित्र्य नष्ट होत आहे. आयोजकांनी सण साजरे करताना हिंदू सणांचे पावित्र्य राखावे, हीच नम्र विनंती.

**- अनंत आंगचेकर,** ठाणे

### आयटीआयमध्ये संविधान मंदिर स्वागतार्ह

राज्यातील सर्व ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था(आयटीआय)आणि १६३ शासकीय तांत्रिक विद्यालयात संविधान मंदिर उभारले जाणार असून, येत्या ७७व्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला या सर्व संविधान मंदिरांचे एकाचवेळी ऑनलाइन माध्यमातून उदघाटन होणार आहे. या मंदिरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना राज्यघटनेचे महत्त्व समजावणे तसेच सामाजिक न्यायाची शिकवण देणे हे उद्देश असल्याचे सरकारी सूत्रांकडून सांगण्यात आले. आयटीआयच्या विद्यार्थ्यांना भारतीय राज्यघटनेतील तरतुदींचे सखोल ज्ञान व आकलन व्हावे यासाठी वेळोवेळी कार्यशाळा आणि शिबिरे भरविण्यात येणार आहेत. आयटीआयमध्ये संविधान मंदिरे उभारण्याची ही संकल्पना स्वागतार्ह असून, ती केवळ आयटीआयमध्ये न राबवता, सर्व शाखांतील महाविद्यालयात राबवावी.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

### 'तो' सुदिन स्वप्नातच!

प्रतिवर्षाप्रमाणे गणेशोत्सव काळात यंदा एसटी महामंडळाने ४३०० जादा, तर रेल्वे प्रशासनाने २० स्पेशल गाड्या चालविण्याची घोषणा केली आहे. असे निर्णय प्रतिवर्षी गणेशोत्सव काळात अथवा सणासुदीला घेतले जातात. मात्र प्रश्न आहे की, तरीसुद्धा गणेशभक्तांना, कोकणी प्रवाशाला कधी सुखाचा प्रवास लाभल्याचे आठवत नाही. चेंगराचेंगरी, तू तू मैं मैंच्या एकांकिका, तासनतास ठप्प होणारा प्रवास, प्राथमिक गरजांच्या प्रचंड गैरसोयी आदी अनेक समस्यांना दरवर्षी तोंड दिल्याशिवाय प्रवास चुकत नाही हा अनुभव आहे. ज्या दिवशी या कालावधीत कोकणी माणसाचा प्रवास सुखाचा, समाधानाचा, विनासायास होईल तो सुदिन. त्याच सुदिनाची वाट पाहणं, हेच कोकणी माणसाच्या नशिबी होय.

**- विश्वनाथ पंडित,** ठाणे



## चांदोरी सायखेडात पूर परिस्थितीची पाहणी

**निफाड :** चांदोरी, सायखेडा व गोदाकाठ परिसरात निर्माण होणाऱ्या पूर परिस्थिती संदर्भात प्रांत हेमांगी पाटील, तहसीलदार विशाल नाईकवाडे, सरपंच विनायक खरात, सरपंच संदीप टर्ले, पोलीस पाटील अनिल पाटील गडाख, सायखेडा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विकास ढोकरे, महावितरण, जलसंपदा खाते व आपत्ती व्यवस्थापन समिती चांदोरी यांच्या प्रमुख उपस्थितीत आपत्कालीन बैठक घेऊन पुरस्थितीचा आढावा घेण्यात आला. यावेळी सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. चांदोरी व सायखेडा पुलाची पाहणी करून जलसंपदा खात्यास पानवेलीसंदर्भात योग्य ते आदेश देण्यात आले. तसेच प्रशासनातर्फे व चांदोरी ग्रामपालिकेतर्फे नागरिकांना सुरक्षितता बाळगण्याचे व सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले. सागर आहेर, अशपाक शेख, सागर गडाख, ओमकार टर्ले , पप्पू वाघ व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# श्रीवास्तव, उजागरे यांचा आणखी एक गैरव्यवहार उघड

## ९९९ वर्षांचा बेकायदेशीर करार, धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेतली नसल्याचा संशय

**◆ नाशिक (प्रतिनिधी) :**

नाशिक डायोसेशन भूखंडात शहरातील नामवंत एच जोशी गॅसचे संचालक राघवेंद्र जोशी यांनी देखील जवळपास एक हजार वाराचा भूखंड तब्बल ९९९ वर्षाच्या कराराने घेतला आहे.या भूखंडाचे शासकीय मूल्य ४ कोटी ८६ लाख ३२ हजार इतके असून बाजार मूल्य मात्र वेगळे आहे. मास्टरमाईंड अजय श्रीवास्तव आणि जवाहर उजागरे यांनी या भूखंडाचे दस्त नोंदवून दिले आहेत. या व्यवहारात तत्कालीन दुय्यम निबंधक ठाकरे यांची भूमिका देखील संशयास्पद असून ट्रस्ट च्या मिळकतीचे दस्त ९९९ वर्षाच्या करारावर नोंदवून दिल्याने ठाकरे यांची चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. नाशिक डायोसेशन भूखंड कांड मध्ये भूखंड घेणाऱ्यांचा देखील बुरखा फाटला जात आहे.

ट्रस्टची मिळकत अगदीच कवडीमोल भावात मिळत असल्याने शहरातील अनेक धनदांडग्यानी या भूखंडाचे श्रीखंड ओरबाडले आहे. या प्रकरणी दुय्यम निबंधक प्रमोद वामन यांनी केवळ एका प्रकरणात गुन्हा दाखल केला असून इतरांविरुद्ध कारवाई कधी होणार असा सवाल उपस्थित केला जात आहे.

शरणपूर गावठाणातील सिटीसर्वे नंबर ७३७५ मध्ये एच जोशी गॅसचे संचालक राघवेंद्र जोशी यांनी तब्बल ९७५ वाराचा भूखंड घेतला आहे. त्याचा दस्त क्रमांक २४७६ /२०२० असा आहे.नाशिक डायोसेशन ट्रस्टच्या भूखंडाचा व्यवहार करताना धर्मदायुक्तांची परवानगी घेणे आवश्यक असते. असे असताना राघवेंद्र जोशी यांनी कुठली ही परवानगी न घेता भूखंडाचे दस्त थेट ९९९ वर्षासाठी नोंदविला आहे. या भूखंडाचे शासकीय मूल्य ४ कोटी ८६



**डायोसेशन भूखंड कांड**

लाख ३२ हजार इतके असून बाजार मूल्य त्यापेक्षाही जास्त आहे. त्यामुळे हा पैसा नेमका कोणाच्या घशात गेला याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

या प्रकरणात दुय्यम निबंधक ठाकरे यांची भूमिका देखील संशयास्पद असून दस्त नोंदविताना कुठलीही खबरदारी न घेता किंबहुना तशी मिळकत नोंदवून देताना धर्मदाय आयुक्त यांची परवानगी नसताना दस्त नोंदवून दिले त्यामुळे प्रमोद वामन यांना जशी उपरती सुचली त्याप्रमाणे ठाकरेंना सुचेल का?असा सवाल उपस्थित केला जात आहे.

> “ शरणपूर गावठाणातील मिळकतीची चौकशी झाल्यास मोठा घोटाळा उघड होऊ शकतो. मी केलेला व्यवहार आणि प्रकाश लढ्ढा यांचा व्यवहार या दोन्हीचेही स्टेटस एकच आहे. मी सर्व कायदेशीर बाबी तपासून व्यवहार केला आहे. याबाबत आमचे कायदेशीर सल्लागार अधिक माहिती देऊ शकतात. तरीही यात माझी फसवणूक झाली असे निदर्शनास आल्यास मी रीतसर फौजदारी गुन्हा दाखल करील.
>
> - **राघवेंद्र जोशी**, संचालक, एच. जोशी गॅस

> “ नियमाप्रमाणे खरेदी देणार घेणार कोण आहेत हे बघण्याचा आमचा संबंध नाही. आम्ही केवळ स्टॅम्प ड्युटी योग्य भरली आहे का याची तपासणी करतो. त्यामुळे दस्तातील सत्यता पडताळून घेण्याची जबाबदारी खरेदी घेणार यांची असते.
>
> - **एस.आर.ठाकरे**, तत्कालीन दुय्यम निबंधक, नाशिक १

## वेचक

### चणकापूर धरणातून १०५०० क्यूसेस पाण्याचा विसर्ग

**मालेगाव :** गिरणा नदी काठावरील गावातील सर्व नागरिकांना आणि संबंधित शासकीय यंत्रणांना कळविण्यात येते की,आज दि. ०४/०८/२०२४ सकाळी ७.०० वाजता. चनकापूर धरणात एकुण पाणी साठा १७१३ दलघफु (७०.५८%) आहे. धरण पाणलोट क्षेत्रामध्ये पावसाची संततधार चालू असल्यामुळे धरणातून १०५०० क्युसेक पाणी गिरणा नदी पात्रात सोडण्यात आलेले आहे. धरण परिसरातील नद्या व नाले दुथडी भरून वाहत आहे. धरणातील पाणी साठ्यातील होणारी झपाट्याने वाढ तसेच पावसामुळे येणारा येवा बघता पुढील कालावधीत धरणामधील आवक बघून टप्याटप्याने विसर्ग वाढविण्यात येईल.तरी गिरणा नदीकाठच्या नागरीकांना आवाहन करण्यात येते की नदीप्रवाहात कोणीही जावू नये तसेच नदीकाठ लगतच्या आपआपली पशु-धन, चीजवस्तु, शेतीमोटार पंप सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे. संबंधित शासकीय यंत्रणांनी याबाबत दक्षता घ्यावी असे आवाहन उपविभागीय अभियंता पाटबंधारे विभाग कळवण यांनी केले आहे.

### नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

**नाशिक :** पावसाचा जोर ४ ऑगस्ट रोजी दुपारी वाढला असल्यामुळे व गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग होत आहे व तो टप्प्याटप्प्याने वाढणार असल्यामुळे नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सुरक्षित स्थळी स्थलांतरित व्हावे.पूर बघण्यासाठी नागरिकांनी नदीकिनारी गर्दी करू नये. कुठलाही धोका पत्करू नये. तसेच आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास ०२५३, २५७१८७२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ.अशोक करंजकर, अतिरिक्त आयुक्त तथा आपत्कालीन विभाग प्रमुख स्मिता झगडे यांनी केले आहे.

### घोडेगाव येथील कांद्याला ३ हजार रुपयांपर्यंत भाव

**नेवासा :** नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपआवार घोडेगाव येथील कांदा मार्केटमध्ये शनिवार ३ ऑगस्ट रोजी कांद्याला जास्तीत जास्त ३००० रुपयेपर्यंत भाव मिळाला. कांदा लिलावासाठी ४७२९७ कांदा गोण्यांची आवक झाली. नवीन उन्हाळी कांद्याला मिळालेले भाव पुढील प्रमाणे एक-दोन लॉटला २९०० ते ३०००, मोठा कांदा २७०० ते २९००, मुक्कल भारी २६०० ते २७००, गोल्टा २३०० ते २७००, गोल्टी २००० ते २५००, हल्का डॅमेज जोड १००० ते १६०० रुपयापर्यंत प्रतिक्विंटल प्रमाणे भाव मिळाले.

### अक्राळे फाट्यावर बस कारची धडक; बसने घेतला पेट



**नाशिक :** वणी - नाशिक रस्त्यावरील अक्राळे फाट्याजवळ बस आणि बलेनो कार या दोन वाहनांचा समोरासमोर अपघात होऊन बसने पेट घेतल्याची घटना घडली आहे. या अपघातात बलेनो कारमधील दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बलेनो कार ही नाशिककडे येत होती. तर कळवण आगाराची बस क्र. एम एच ०६ एस ८४३९ ही कळवण येते जात होती. यावेळी अक्राळे फाट्याजवळ दोन्ही वाहनांचा अपघात झाला. त्यामध्ये बसने पेट घेतल्याने बलेनो कारमधील दोघांचा मृत्यू झाला. तर बसमधील सर्व प्रवाशी सुखरूप असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच दिंडोरीचे पोलीस निरीक्षक रघुनाथ शेगर यांच्यासह दिंडोरी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर त्यांनी आग विझविण्याचे प्रयत्न केले. बसचालक हा ओव्हरटेक करत असतांना अपघात झाल्याचे प्रथम दर्शनी असलेल्यानी सांगितले आहे.

# स्मार्ट सिटीच्या रस्त्यांवर पावसाच्या पाण्याचे तळे; पादचारी-दुचाकी चालकांची तारांबळ

**◆ पंचवटी (प्रतिनिधी):**

शहरातील अनेक भागात पावसाला सुरुवात झाली असून काल पासून पावसाची जोरदार हजेरी लावली आहे.या पावसात पंचवटीत अनेक ठिकाणी रस्त्यावर, चौकात, सिग्नलवर रस्त्याच्या मध्यभागी पावसाच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने ठिक ठिकाणी पाणी साचून तळे तयार होत आहे. यामुळे दुचाकी चालकांसह पायी चालणाऱ्या नागरिकांना तारांबळ उडत आहे. यामुळे रस्त्याने चालतांना रस्त्यात साचलेल्या तळ्यातील पाण्यातून वेगाने वाहन गेल्यास रस्त्यांवरील खराब पाण्याने भिजण्याचा व कपडे खराब होण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहे. तसेच अशा वेळी समोरून येणाऱ्या वाहनाबरोबरच शेजारील वाहनावर देखील लक्ष ठेवावे लागत आहे. अशा वेळी अपघाताचा धोका अधिक आहे. तरी याकडे बांधकाम विभागाने तातडीने याकडे लक्ष घालुन सदरची समस्या सोडविणे अत्यंत गरजेचे आहे.

गेल्या काही दिवसांत पावसाला चांगलीच सुरूवात झाली आहे. शुक्रवार रात्री पासून पाऊसाची संतप्त धार सुरू होती. शनिवार ता.०३



मुंबई-आग्रा महामार्गावरील तपोवन कॉर्नर येथे साचलेले पाणी.

रोजी देखील दिवसभर पाऊस हा सुरूच होता.

यामुळे ठिकठिकाणी पावसाच्या पाण्याने व रस्ता, चौक, सिग्नल, रस्ता दुभाजक, फुट पाथ रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या मोकळ्या जागेला योग्य प्रमाणात उतार दिला नसल्याने व उताराच्या ठिकाणी पाणी जाण्यासाठी चेंम्बर नसल्याने व काही ठिकाणी उताराच्या ठिकाणी त्याचे नियोजन केलेले नसल्याने त्याचा फटका नागरिकांना बसत आहे. पंचवटीतील जुना आडगाव नाका, मखमलाबाद रोड, क्रांतीनगर, ड्रिम कॅसल चौक, मालेगांव स्टॅण्ड, दिंडोरी रोड, औरंगाबाद नाका, पंचवटी कारंजा, मालेगाव स्टॅन्ड, नाग चौक, गजानन चौक, सरदार चौक, पेठ नाका, रामवाडी, हनुमान वाडी, निमाणी, सेवा कुंज, अमृतधाम चौक, पेठ रोडवरील शरदचंद्र पवार मार्केट यार्डसमोरील परिसर, मेहेर धाम, तारवाला नगर, मेरी, म्हसरूळ, हिरावाडी रोड, कार्यसिद्धी चौक, नांदुर नाका, आडगाव, जत्रा हॉटेल चौक, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी मार्गावर अनेक ठिकाणी, चौका चौकात रस्त्याच्या मधोमध, रस्त्याच्या कडेला पाण्याचे तळे साचत आहे. तसेच गंगाघाटा जवळील परिसर देखील वर्षानुवर्ष जलमय होत आहे. यामुळे रस्त्याने पादच्याऱ्यांना व दुचाकीस्वारांना यातुन वाट काढणे अवघड होत आहे.

पावसाळ्यात दर वर्षी त्याच त्याच परिसरात वर्षानुवर्ष तळे साचत असतांना मात्र नाशिक महानगरपालिकेतील सबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून नेमकी कुठली उपाय योजना केली जात याबाबत प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे. तर दर पावसाळ्यात याकडे डोळझाक केली जात असल्याचे दिसून येत आहे. दर वर्षी पावसाळयापूर्वी पावसाळी कामांच्या घोषणा व दुरुस्तीची करोडो रुपयांची टेंडर काढली जातात. मात्र वर्षानुवर्ष परिस्थिती जैसे थेचं आहे. स्मार्ट सिटी विभागातून होणाऱ्या कामांबाबत देखील तिच परिस्थिती दिसून येते. नाशिक शहर स्मार्ट सिटीचे ठिकठिकाणी फक्त फलक लावून प्रसिध्दी मिळवली जात असतांना प्रत्यक्ष कामात मात्र तो स्मार्टनेस कुठेही दिसून येत नाही ही या स्मार्ट शहराची शोकांतिका म्हणावी लागेल.

# जुनी कुरापत काढत माजी नगरसेविकेच्या मुलाचा खून



**◆ मनमाड (प्रतिनिधी):**

माजी नगरसेविका नूतन देविदास पगारे यांच्या मुलाच्या हत्तेने मनमाड शहर हादरले असून मागील भांडणाची कुरापत काढत टोळक्याने २८ वर्षीय शुभम पगारेचा खून झाला.

शुभम पगारे हा मित्राच्या घरी वाढदिवसासाठी गेला असता तो परत आपल्या घरी जात असताना टोळक्याने शुभम पगारे घरी येत असता आरोपी समोरासमोर आल्याने मागील भांडणाची कुरापत काढून एकमेकांवर वार करीत त्यात शुभम पगारे हा गंभीर जखमी झाला.

शुभम हा जखमी अवस्थेत असताना उपजिल्हा रुग्णालयात उपचारास दाखल केले असता यानंतर नाशिक येथे हलवण्यात आले. उपचारादरम्यान शुभमचा मृत्यू झाला. या बातमीची वाच्यता होताच नातेवाईकांनी व नागरिकांनी संतप्त होत आरोपी अटक करण्याच्या



मागणीसाठी मोर्चा काढत पोलीस स्टेशनला घेराव घालत आरोपी यास अटक करण्याची मागणी केली.

जोपर्यंत आरोपी अटक होत नाही तोपर्यंत अंत्यविधी केला जाणार नाही अशा घोषणा देत काही काळ पोलीस स्टेशन परिसरात तणावाचे वातावरण निर्माण केले. या कारणास्तव पोलीस प्रशासनाने वाढीव पोलीस बंदोबस्त वाढवत जमावास शांत केले व आरोपीला तात्काळ अटक करण्यात येईल असा शब्द दिल्यानंतर जमावाने शांत होत मृतदेह ताब्यात घेऊन अंत्यविधीसाठी नेण्यात आला.

# श्रीरामपुरात काँग्रेसमध्ये उमेदवारीवरून कानडे आणि ओगले यांच्यात संघर्ष?

**स्वप्निल सोनार**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर विधानसभा उमेदवारी वरून काँग्रेस मधील लहुजी कानडे आणि हेमंत ओगले यांच्यात संघर्ष होण्याची शक्यता आहे. श्रीरामपूर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी - युवक संवाद यात्रेचा शुभारंभ करण ससाणे व हेमत ओगले यांनी उद्घाटन करून राजकीय वातावरण तापवले आहे. श्रीरामपूर विधानसभेत आमदार राहिलेल्या लहुजी कानडे यांनी सुद्धा गावागांवात जाऊन भेटीगाठी घेऊन आपण उमेदवारीच्या स्पर्धेत असल्याचे संकेत दिले आहेत.सध्या श्रीरामपूर विधानसभेत काँग्रेस कडून लहुजी कानडे विद्यमान आमदार आहेत.मात्र यानंतरही गेल्या काही दिवसापासून याच मतदारसंघात हेमंत ओगले यांनी विविध सेवा योजना कार्यक्रमांचा धडाका लावून एक प्रकारे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराची सुरुवात केली आहे. हेमंत ओगले हेच श्रीरामपूर विधानसभेतील उमेदवार असतील अशा पोस्ट त्यांचे कार्यकर्ते सोशल मिडीयातून व्हायरल करीत असल्याने श्रीरामपूर मतदारसंघात कानडे विरूध्द ओगले असा संघर्ष अटळ झाला आहे.सध्या काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस या पदाची धुरा संभाळणारे हेमंत ओगले हे या आधी श्रीरामपूर विधानसभेतून उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुक होते. परंतु पक्षाकडून त्यांना थांबवण्यात आले होते. तर लहुजी कानडे हे २०१९ च्या विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर उमेदवारी न मिळाल्याने शिवसेना म्हणजेच उद्धव ठाकरे यांची साथ





**सोशल मीडियावर कार्यकर्त्यांकडून ओगले यांच्या उमेदवारीची पोस्ट व्हायरल**

सोडत त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. यावेळी मात्र २०२४ ला होणाऱ्या विधानसभा निवडणूकीसाठी हेमंत ओगले यांनी आमदारकीसाठी शड्डू ठोकला आहे.यासाठी त्यांनी श्रीरामपूर विधानसभा मैदान निवडले आहे. त्याअनुषंगाने मतदारसंघात गेल्या काही दिवसांपासून ओगले यांनी कार्यक्रमांचा धडाका लावला असून पक्षाचे जुने जाणत्या कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी सुरू केल्या आहेत. करण ससाणे यांनी श्रीरामपूर येथे मध्यवर्ती भागात जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे.या जनसंपर्क कार्यालयात सर्वच शासकीय कामे तसेच पक्षातील कार्यकर्त्यांची कामे होण्यासाठी मदत मिळते. मी पक्षाचा राष्ट्रीय सरचिटणीस असून पक्षाच्या वाढीसाठी शहरात सर्वच भागात कार्यरत राहणे माझे कर्तव्य असल्याचेही यावेळी ओगले यांनी स्पष्ट केले आहे.तर एका कार्यक्रमात श्रीरामपूर विधानसभे बाबतच्या उमेदवारीवरून भाष्य करण्याचे टाळले असले तरी त्यांच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. सोशल मिडीयातून आक्रमक प्रचार करीत श्रीरामपूर मधील आमदार हेमंत ओगले (तात्या) असे संदेश व्हायरल केले जात आहेत. हेमंत ओगले यांच्या वाढदिवसाच्या बॅनरवर सुद्धा लक्ष विधानसभा "फक्त तात्या" अशा आशयाचे बॅनर संपूर्ण श्रीरामपूरात लावले होते. परंतु याबाबत ओगले यांना विचारले असता त्यांनी मात्र याबाबत भाष्य करण्याचे टाळत कोणत्या विधानसभा मतदारसंघात कुणाला उमेदवारी द्यायचे हे वरिष्ठ नेते ठरवतील असेही पत्रकारांशी बोलतांना सांगितले म्हटले आहे.एकंदरीतच घोडा मैदान जवळ आहे.विधानसभा निवडणुकीसाठी अवघे काही दिवस उरले असून श्रीरामपूर मतदारसंघात या दोघांपैकी काँग्रेसकडून कोणाला तिकीटाची लॉटरी लागणार आणी कोण स्वार होणार हे पहाणे औत्सुक्याचे ठरणार आहे. सध्या तरी कानडे आणी ओगले संघर्ष अटळ असल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

# प्रवास तीन दशकांचा आनंद साईचरित्र पारायण सोहळ्याचा

**राजकुमार जाधव**

**शिर्डी :** श्री साईबाबांच्या चरित्र कथांचे वाचन केल्यास भक्तांच्या हृदयात श्रद्धा निर्माण होऊन आत्म साक्षात्काराची प्राप्ती होईल.तसेच कोणत्याही प्रकारची कमी भासणार नाही, हे विधान आहे साक्षात शिर्डीच्या परब्रह्म श्री साईबाबांचे !

आजपासून पवित्र श्रावण मासारंभ सुरू होत आहे.

या पवित्र महिन्यात प्रत्येक दिवशी आपल्या देवतेची पूजा व्रत करण्याची हिंदू धर्मात परंपरा आहे. या महिन्यात केलेल्या उपासनेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. त्या अनुषंगाने आजपासून करोडो साईभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री साईबाबांच्या शिर्डीत साई चरित्र या पवित्र ग्रंथाचे पारायण सोहळ्यास सोमवार ५ ऑगस्ट पासून साई संस्थानाच्या एक हजार रुम भक्त निवास येथे प्रारंभ होत असून दि.१२ ऑगस्ट २०२४ ला सांगता होणार आहे.श्रद्धा आणी सबुरीचा संदेश देणाऱ्या आंतरराष्ट्रीय तिर्थक्षेत्र शिर्डी नगरीत नाट्यरसिक संच शिर्डी यांच्या संकल्पनेतून १९९४ सालापासून श्री साईचरीत्र ग्रंथाचा पारायण सोहळा सुरू करण्यात आला आहे.

आज या सोहळ्याला तीन दशकं उलटली असून यंदाचे ३० वे वर्ष आहे.सुरवातीला हा सोहळा मंदिर परिसरात लेंडीबागे समोरील जागेवर होत असे.पहिल्या वर्षी या साई चरित्र पारायण सोहळ्यात अवघ्या ७१ साईचरीत्र वाचकांची संख्या होती.ती आजमितीला २० हजार भाविकांपर्यत जाऊन पोहचली आहे.सुरवातीला श्री साईबाबांचे समकालीन साईभक्त काशिराम शिंपी यांचे नातू तथा साईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त श्री शांताराम मिराणे सर यांचा नाट्यरसिक संचात सक्रीय सहभाग असायचा. त्यांच्या मधुर वाणीतून वाचक वर्ग प्रभावित होत असे. आजही त्यांच्यावर प्रेम करणारा मोठा वर्ग शिर्डीसह राज्यभरात आहे. शिर्डी नाट्यरसिक संचाचे अशोक नागरे, गणपत गोंदकर, प्रकाश गायके, बि.डी.साबळे, आप्पासाहेब कोते, अशोक कोते, सुभाष घुगे, आर्दीसह प्रथम नगराध्यक्ष

## अभूतपूर्व सोहळ्यास देशभरातून हजारो साईभक्त शिर्डीत दाखल



कैलासबापू कोते, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रमेशभाऊ गोंदकर,माजी नगराध्यक्ष शिवाजी गोंदकर, माजी उपनगराध्यक्ष अभय शेळके, साई निर्माण उद्योग समूहाचे अध्यक्ष विजय कोते, साईसंस्थानचे माजी विश्वस्त सचिन तांबे,सामाजिक कार्यकर्ते नितीन उत्तम कोते, मनसेचे नगरसेवक दत्तात्रय कोते, आदी मान्यवरांसह शिर्डी ग्रामस्थांनी या अभुतपुर्व सोहळ्याचे महत्त्व, प्रचार व प्रसार जगभरात पसरविण्यासाठी परिश्रम घेतले आहे. त्यामुळेच या पारायण सोहळ्यास देशभरातून हळूहळू गर्दी वाढू लागली.आज या पारायण सोहळ्याचे स्वरूप बदलले आहे.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, नाट्य रसिक संच आणी शिर्डी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने हा पारायण सोहळा दैदिप्यमान साजरा केला जातो.यामध्ये राज्यातून तसेच शिर्डीसह पंचक्रोशीतील हजारोंच्या संख्येने महिला आणी पुरुष या पवित्र साईचरीत्र ग्रंथाचे वाचन करण्यासाठी सहभागी होतात. साईचरीत्र पारायण का करावे ? यासाठी आवर्जून या लेखात उल्लेख करावासा वाटतो कि, संतांच्या कथा वाचन करावे अथवा ऐकणे हे काही अवघड काम नाही.या कथा संसार भयापासून मुक्त करतात.

आपल्याला आध्यात्मिक मार्गावर घेऊन जातात. म्हणून त्या कथा वाचल्या आणी ऐकल्या पाहिजेत. त्यावर मनन करून त्या आत्मसात करायला हव्यात.माझ्या लीला लिहिल्या तर अविद्या नाहीशी होईल आणि जर का त्या ध्यानपूर्वक तसेच भक्तिमय अंतःकरणाने वाचन केल्यास लौकिकी जगाच्या अस्तित्वाची जाणीव मावळेल आणि प्रेम भक्तीच्या प्रबळ लाटा उसळतील.जर कोणी माझ्या लिलांमध्ये खोल गढून गेला तर त्याला ज्ञानाचे मौल्यवान रत्न मिळतील.असे साक्षात परब्रह्म श्री साईबाबा म्हणत असे.त्याचप्रमाणे माझ्या कथा ऐकल्या तर सर्व रोग नाहीसे होतील.म्हणून माझ्या कथा आदराने वाचा त्यावर विचार करा, हाच आत्मसंतुष्टी आणि सुखाचा राजमार्ग आहे. यंदा या साईचरीत्र पारायण सोहळ्यास मोठ्या उत्साहात प्रारंभ होत आहे. सात दिवस चालणाऱ्या सोहळ्यात विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

साईबाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिर्डी नगरीत साईचरीत्र ग्रंथ वाचनाची हि संधी वर्षातून एकदाच लाभते त्यामुळे जास्तीत जास्त संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन नाट्य रसिक संच तसेच शिर्डी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कळवणला साकारतंय नूतन दर्जेदार बसस्थानक, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे हस्ते भूमिपूजन

**◆ कळवण (प्रतिनिधी):**

कळवण बसस्थानक पुनर्बांधणी व वाहनतळाचे कॉंक्रीटीकरण अत्यंत दर्जेदार होणार असून या कामामुळे बसस्थानकाचा चेहरा मोहरा बदलणार असून त्यात कळवण शहराच्या वैभवात भर पडणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

कळवण बसस्थानकाच्या पुनर्बांधणी व वाहनतळाच्या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कळवण सुरगाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार नितीन पवार यांच्या अथक प्रयत्नांनी कळवण बसस्थानकांसाठी ९ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याने आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी आ.नितीन पवार हे होते. या कार्यक्रमाप्रसंगी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, आ.दिलीप बनकर, रवींद्र पगार, कौतिक पगार, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती धनंजय पवार, तालुकाध्यक्ष राजेंद्र भामरे, उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सत्कार मोतीराम पगार,भावेश पगार,साईल पगार यांनी केला तर आ.नितीन पवार यांच्या सत्कार श्रीकांत परदेशी यांनी केला. कळवण बसस्थानकाबरोबरच नांदुरी येथील बसस्थानकाचेही नूतनीकरण केले जाणार असल्याची माहिती राप महामंडळाचे विभागीय नियंत्रक अरुण सिया यांनी दिली. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी पुलकित सिंह, आगार प्रमुख संदीप बेलदार, मोतीराम पगार, साहिल पगार, भावेश पगार, दीपक पगार, अमित पगार, आर्दीसह कळवणआगाराचे कर्मचारी, प्रवाशी बांधव मोठ्यासंख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन किशोर पगार यांनी तर साहिल पगार यांनी मानले.

# धोंडराई परिसरातील रस्ते पोखरु लागले!

## दुर्लक्ष : खड्डेमय रस्त्यामुळे अपघाताची शक्यता वाढली

गेवराई पुण्यभूमी प्रतिनिधी

मोबाईल कंपनीच्या केबल घालण्यासाठी खाजगी कंपन्याकडून उमापूर फाटा ते बाग पिंपळगाव फाटा तसेच धोंडराई परिसरातील रस्ते पोखरले जात आहेत. बांधकाम विभागाच्या कृपेमुळे ऐन पावसाळ्यातच हे काम सुरू आहे. याकडे लोकप्रतिनिधींचा दुर्लक्ष आहे. त्यामुळे अर्धवट खोदाई करून ठेवलेल्या रस्त्यात अपघात होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे याकडे तात्काळ गांभीर्याने लक्ष देऊन सुरू असलेले खोदाईचे काम रोखावे, अशी मागणी जनतेतून होत आहे.

गेले काही दिवस बाग पिंपळगाव फाट्यापासून ते उमापूर पर्यंत एका खाजगी मोबाईल कंपनीच्या माध्यमातून केबल घालण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी थेट नव्याने करण्यात आलेले रस्ते खोदून त्या ठिकाणी केबल घालण्यात आल्या तर सद्यस्थितीत त्याच कंपनीकडून बोअरींग करून केबल घातली जात आहे. मात्र या परिस्थितीत धोंडराई परिसरातील नव्याने करण्यात आलेले रस्ते उखडून टाकण्यात आले आहे. विशेष म्हणजे त्या ठिकाणी नव्याने करण्यात आल्यानंतर रस्ते



उखडून टाकण्यात आले आहेत. मात्र अनेक ठिकाणी काम झाल्यानंतर रस्ते सुस्थितीत केले नसल्यामुळे त्या खड्ड्यात पावसात पाणी साचून रस्त्याचा अंदाज न आल्यामुळे होणाऱ्या अपघातांची संख्या वाढणार आहे. तर दुसरीकडे चुकीच्या पद्धतीने खोदाई करण्यात आल्यामुळे अनेक गावांना व शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईन अनेक ठिकाणी तुटल्याचे पुढे आले आहे.

याबाबत गेवराई न्यूजने आवाज उठवला होता. तसेच पावसाच्या तोंडावर सुरू असलेले हे काम तात्काळ बंद करावे, अशी मागणी त्यांनी केली होती. परंतु त्यांच्या व नागरिकांच्या मागणीकडे दुर्लक्ष करत संबंधित कंपन्यांकडून आम्हाला बांधकाम विभागाने परवानगी दिली आहे, असे सांगून खोदाईचे काम सुरूच आहे. सद्यस्थितीत बांधकाम विभागाच्या कार्यालयाच्या आशीर्वादाने हे काम सुरू आहे तर यापूर्वी बाग पिंपळगाव फाटा, बेलगाव, धोंडराई कॅम्प, तळणेवाडी, माऊली फाटा, उमापूर फाटा व उमापूर फाटा ते राक्षसभुवन जाणार रस्ता अशा मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यावर अनेक ठिकाणी खोदाई करण्यात आली. मुख्य म्हणजे खोदाई झाल्यानंतर रस्ते तशाच अवस्थेत ठेवण्यात आले आहेत. काही ठिकाणी तात्पुरती मलमपट्टी करण्यात आली. परंतु त्या ठिकाणी घालण्यात आलेली माती, दगड खाली बसून आणखी खड्डे पडल्याची स्थिती निर्माण झाली आहे. याबाबत परवानगी चे विचारले असता उप अभियंता घोळवे यांनी परवानगी बाबत माहिती नसल्याची माहिती दिली, असे सांगून सार्वजनिक बांधकाम प्रशासनाने हातवर केले आहेत. या सर्व परिस्थितीत पान २ वर...

# फारोळा–म्हारोळा रस्त्याचे काम अर्धवट?

## संतप्त: रस्त्यावर पाणी तुंबत असल्याने गैरसोय



पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील फारोळा ते म्हारोळा गावाला जोडणारा हा रस्ता ३ किलोमीटरचा आहे.हा रस्ता खराब झाल्यामुळे गावकऱ्यांनी सतत पाठपुरावा केल्यानंतर या रस्त्याच्या कामासाठी दोन कोटी ३० लाख रुपये निधी या रस्त्यासाठी आमदार फंडातून मंजूर झाला आहे. संबंधित काम एसबी कन्स्ट्रक्शन छत्रपती संभाजी नगर या एजन्सीला मिळाले होते.

गुत्तेदार एजन्सीने दिवाळीला डांबरी रस्त्याचे काम सुरू केले होते.मात्र गुत्तेदाराने अर्धवट काम केले ते ही अतिशय निकृष्ट दर्जाचेच! फारोळा ते म्हरोळा गावाला जोडणाऱ्या रस्त्याचे काम गुत्तेदाराने अर्धवट सोडून दिल्याने सध्या पावसाचे पाणी रस्त्यावर साचत आहे. अर्धवट झालेला हा रस्ता लवकरात लवकर करावा अशी मागणी फारोळा– म्हारोळा येथील गावकऱ्यांनी केली आहे.या रस्त्यावरती सध्या पावसाचे पाणी तुंबत असल्याने पान २ वर...

# रक्तदान जगातले सर्वात श्रेष्ठ दान

## नितीन सोनवणे : बीडमध्ये दिपक केदारांचा वाढदिवस

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मानवी रक्त कुठल्याही प्रयोगशाळेत तयार करता येत नाही ज्यावेळी रक्ताची गरज लागते त्यावेळेस मानवी शरीरातूनच काढून घ्यावे लागते म्हणून रक्तदान शिबिर आयोजित करणे गरजेचे आहे जेव्हा तुम्ही रक्तदान करतात तेव्हा फक्त एकाच रुग्णाला फायदा होतो परंतु जेव्हा तुम्ही रक्तदान शिबिर आयोजित करतात त्यात संकलित झालेल्या रक्तपिशव्यांमुळे शेकडो रुग्णांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवु शकतात यामुळेच शिबिर आयोजित करणे महत्त्वाचे आहे




रक्तदान हे अनमोल असे जिवदान आहे आपले रक्तदान एखाद्या गरजवंत रुग्णांना, अपघात ग्रस्ताला जिवदान ठरु शकते, कुणाला कधी आणि कुठे रक्ताची गरज भासेल हे सांगता येतं नाही म्हणूनच रक्तादान करुन समाजाचे ऋण फेडुया हा विचार आपण सर्वांनीच अंगीकारला पाहिजे तसेच रक्तदानामुळे रक्तदात्याच्या शरीरात नवीन रक्त निर्माण करण्याच्या नैसर्गिक प्रक्रियेला चालना मिळते.

आपल्या देशात थॅलिसिमिया रुग्ण खुप आहेत त्यांना दर १५ दिवसांनी रक्ताची गरज भासते, रक्तदान करून तुम्ही त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणु शकता. म्हणून सर्व सामाजिक कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबीर आयोजित केले पाहिजेत. त्याच अनुषंगाने आज बीड शहरामध्ये सिटी ब्लड बँक या ठिकाणी ऑल पान २ वर...

# शेकापला मराठवाड्यात नविन चेहरा

## निवड : राज्यचिटणीस मंडळ सदस्यपदी मोहन गुंड

केज /पुण्यभूमी प्रतिनिधी

पंढरपूर येथे शेतकरी कामगार पक्षाचे राज्य अधिवेशन संपन्न झाले.या अधिवेशनात शेतकरी कामगाराच्या प्रश्नावर सातत्याने लाल झेंडा घेऊन आवाज उठवणारे,प्रचंड जनसंपर्क असणारे,शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काम कराणारा चेहरा म्हणून ओळखले जाते.केजचे भूमीपुत्र भाई मोहन गुंड यांची सर्वानुमते निवड झाल्यामुळे प्रमाणिक कार्यकर्त्याला काम करण्याची संधी पक्षाने दिली आहे. भाई मोहन गुंड हे



जवळपास २००४ पासुन पक्षात सक्रिय आहेत, त्यांनी शेतकऱ्याच्या विविध प्रश्नांवर सतत आवाज उठवत आसतात. शेतकर्यांचे अनेक प्रश्न तडीस लावले आहेत,भाईंच्या निवडी मुळे मराठवाड्यातील शेतकर्यांना एक लढवय्या युवा नेता मिळाला आहे.राज्य शेतकरी,कामगार, विद्यार्थी, अदिवाशी इतर सर्व समावावेशक अनेक ठराव घेण्यात आले,शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळ व मध्यवर्ती पान २ वर...

# कडा येथे राबविण्यात आले कार्यक्रम

## उपक्रम : माजी आ.धोंडेंच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

शेतकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात आयोजित रक्तदान शिबीरात ५३ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून रक्तदान केले. तसेच मॅरेथॉन स्पर्धेत विद्यार्थी सहभागी झाले होते.

आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, गंगाई फार्मसी कॉलेज, अहमदनगर येथील जनकल्याण रक्तपेढी, श्रीराम कनिष्ठ महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ हरिदास विधाते होते. व्यासपीठावर प्राचार्य गणेश साबळे, प्राचार्य शहादेव दानवे, उपप्राचार्य बापु खैरे, उपप्राचार्य डॉ भास्कर चव्हाण, प्रा बोडखे उपस्थित होते. रक्तदाता हा रक्तपिढीचा आत्मदाता आहे. युवकांनी रक्तदान शिबीरात सहभागी होऊन जास्तीत जास्त रक्तदान करावे पान २ वर...

# शेतकऱ्यांनी तंत्रज्ञानाचा अवलंब करावा

## धोरण : सोयाबीन,तूरीसह आंतर पिकांची पाहणी



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह परिसरात खरीप हंगामात विविध तंत्रज्ञानाचा वापर करून पेरण्या केलेल्या पिकांची रविवारी( ता.०४) विभागीय कृषी सह संचालक डॉ तुकाराम मोटे यांनी पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले यामध्ये त्यांनी जरंडी ता सोयगाव येथे सायंकाळी पाच वाजता हेमंत पाटील यांच्या गट क्र ३८० शेतामध्ये शून्य मशागत लागवड तंत्रज्ञाने लागवड केलेल्या कपाशीची पाहणी करून मार्गदर्शन केले फळबाग मध्ये ही शून्य मशागत लागवड करता येते या तंत्रज्ञानाच्या लागवडीमुळे मजुरांचा खर्च वाचतो असे सांगून तण नियंत्रण बाबत विभागीय सह संचालक डॉ तुकाराम मोटे यांनी मार्गदर्शन केले दरम्यान कृषी भूषण शेतकरी रवींद्र पाटील यांच्या शेतातील सोयाबीन–तूर आंतर पिकांची लागवड या नावीन्य पूर्ण प्रयोगाची पाहणी पान २ वर...

# आरटीओ कार्यालयात भ्रष्टाचाराचा उत?

## आक्रमक:वंचितने रिकाम्या खुर्चीला दिले निवेदन

अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

उपविभागीय परिवहन कार्यालय येथे आज दि. ०५ ऑगस्ट २०२४ रोजी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने होत असलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने निवेदना मार्फत केली आहे.

अंबाजोगाई ठढज कार्यालयात पैशाच्या देवाण–घेवाणीचा सुळसुळाट सुरु आहे. ठढज कार्यालयातील प्रत्येक कर्मचारी कार्यालयांची सर्व कामे खाजगी व्यक्ती मार्फत पैशाची देवाण–घेवाण करूनच करत आहेत. अंबाजोगाई ठढज कार्यालय, येथील अधिकारी व कर्मचारी खुलेआम जनतेची लूट करत आहेत. खाजगी व्यक्ती अधिकारी, कर्मचारी यांच्या ऑफीसमध्ये बसुन काम करतात. त्यांना तात्त्काळ ऑफीस मधुन बाहेर काढण्यात यावे.

कार्यालयात लर्निंग लायसन्स काढण्यासाठी, परमनंट लायसन्ससाठी, ड्रायविंग टेस्टसाठी, वाहन पासिंगसाठी, वाहन ट्रान्सफरसाठी, परमिट रिनिव्हलसाठी,



फिटनेससाठी या सर्व बाबीसाठी ३०० रुपयांपासून २५०० रुपये पादतीची रक्कम सोडून घेतले जातात. त्यावर हप्तेबाजी वेगळी आहे. हा सर्व भ्रष्टाचार तात्काळ बंद करण्यात यावा अन्यथा वंचित बहुजन आघाडी अंबाजोगाई च्या वतीने स्टिंग ऑपरेशन करून भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या विरोधात मा. उपविभागीय अधिकारी कार्यालय तथा उपजिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई समोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा ईशारा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना या पान २ वर...

# शिवसेना सदस्य नोंदणीला प्रतिसाद !

## राजकीय : केजमध्ये उबाटा गटाचे नियोजन



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे, युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या आदेशानुसार शिवसेना नेते सुनीलजी प्रभु साहेब, शिवसेना उपनेत्या सुषमा ताई अंधारे, मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर साहेब, शिवसेना संपर्कप्रमुख बीड परशुराम जाधव साहेब, बीड लोकसभाप्रमुख सुनिल धांडे सर, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या आदेशानुसार, शिवसेना बीड जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्यामार्गदर्शनाखाली उपजिल्हाप्रमुख दिपक मोराळे तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली आज भगव्या सप्ताहाच्या प्रथम दिवशी केज तालुक्यातील उत्तरेश्वर पिंपरी या ठिकाणी पान २ वर...

## डॉ.योगेश क्षीरसागर : बीडमध्ये गुजर समाजाचा सोहळा

# नवनियुक्त अधिकारी समाजाचे भूषण

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्यातील गुजर समाजातून एकाचवेळी २५ हून अधिक तरुण नोकरीला लागण्याचा कदाचित हा पहिलाच प्रसंग असेल. गुजर समाज हा अत्यंत कष्टकरी समाज आहे. या समाजातून तरुण शासकीय सेवेत येत असल्याचा आनंद आहे. हे नवनियुक्त अधिकारी समाजाचे भूषण आहेत, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

बीडमध्ये गुजर समाज सेवा संघाच्यावतीने नवनियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचा रविवारी (दि.४) सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.

व्यासपीठावर ह.भ.प.बबन महाराज बहिरवाळ, संपादक तय्यब शेख, गुजर समाज सेवा संघाचे अध्यक्ष राजाभाऊ




गुजर, उपाध्यक्ष युवराज बहिरवाळ, सुभाष बहिरवाळ, राणा चौहान, रतन गुजर, सचिव शिवाजी घोशीर, सहसचिव ज्ञानदेव खटाणे, माजी जिल्हाध्यक्ष हनुमान डोंगर, कोषाध्यक्ष पंजाब आहेर, महादेव नहीराळे, सचिन बहिरवाळ, संजय डोंगर, बबन बहिरवाळ, राजेंद्र पवार, गणेश बहिरवाळ यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, नवनियुक्त लोकसेवक हे समाजाचे भूषण ठरत असून विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेऊन वाटचाल करावी. समाजासह पालकांनी तरुणांना पाठबळ द्यावे. गुजर समाज आणि क्षीरसागर परिवार हा गत अनेक वर्षांपासून एकत्र आहे. सुख–दुःखात कायम आपण सोबत आहोत. आगामी काळात गुजर समाजाला शहरानजीक जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करू. समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी खांद्याला खांदा लावून काम करू, असेही ते म्हणाले. यावेळी संपादक तय्यब शेख यांनी नवनियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. समाजाने एकीने रहावे, अशीच प्रगती करत रहावी, अशा शब्दात शुभेच्छा दिल्या. गुजर समाज सेवा संघाचे अध्यक्ष राजेभाऊ गुजर, उपाध्यक्ष युवराज बहिरवाळ यांच्यासह कार्यकारिणीकडून सत्काराचे आयोजन केले होते. सूत्रसंचलन पान २ वर...

# सत्यशोधक महोत्सव उत्साहात साजरा

## अमोल शेरकर : साहित्य सम्राट महोत्सवात श्रोते मंत्रमुग्ध



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरामध्ये युवा नेते अमोल शेरकर यांचे वतीने अण्णाभाउ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमीत्त दि. ४ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात सत्यशोधक महोत्सव महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात साजरा करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्रातील सुप्रसिध्द गायिका मंजुषा शिंदे तसेच गायक संतोष मोरे यांचा परिवर्तनातील वादळ वारा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते करण्यात आले तर प्रमुख उपस्थितीत जयसिंग सोळंके, एकनाथ मस्के, राहुल लंगडे, रोहन घाडगे, शंतनु सोळंके, अविनाश जावळे, राकेश साळवे, पवनराजे देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी गायिका मंजुषा शिंदे, संतोष मोरे यांनी अण्णाभाउ साठे यांच्या जिवनचरित्रावरील व आंबेडकरवादी विवीध गीत सादर करत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले तर सद्दाम शेख यांच्या मिमीक्रीमुळे श्रोते भारावुन गेले. कार्यक्रमास शहरासह तालुका परिसरातील बहुजन चळवळीतील हजारो जाणकार श्रोत्यांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केतन मिसाळ, हनुमंत तुपसौंदर, विक्रम पान २ वर...